रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३२७
www.ramprahar.com

शनिवार, १४ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार; आरोपीला बेड्या/२

म्हसळ्यात पाणीपुरवठा योजनेच्या पाईपची चोरी/५

कमिन्सने कसोटीत गाठला ३०० बळींचा टप्पा/८

## सर्व बोईंग विमानांच्या सुरक्षा तपासणीचे आदेश

**नवी दिल्ली** : एअर इंडिया कंपनीच्या विमान दुर्घटनेनंतर नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने (डीजीसीए) मोठा निर्णय घेत बोईंग ७८७-८/९ विमानांच्या सुरक्षा तपासणीचे आदेश दिले आहेत. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून उड्डाणापूर्वी इंधन पॅरामिटर मॉनिटरिंग, केबिन एअर कॉम्प्रेसर सिस्टम, इलेक्ट्रॉनिक इंजिन नियंत्रण चाचणी, इंजिन इंधन अ‍ॅक्च्युएटर ऑपरेशन, ऑइल सिस्टम आणि हायड्रॉलिक सिस्टमची तपासणी करावी लागणार आहे. टेकऑफपूर्वी पॅरामिटर्सची योग्यरित्या पाहणी करण्याचे निर्देशदेखील देण्यात आले आहेत. याशिवाय दोन आठवड्यांच्या आत पॉवर अ‍ॅश्युरन्स तपासणी करून घेणे तसेच गेल्या १५ दिवसांत बोईंग ड्रीमलाइनर विमानात आढळलेल्या समस्या आणि वारंवार येत असलेल्या बिघाडांचा आढावा घेऊन तातडीने दुरूस्तीचे आदेश देण्यात आले आहेत.



# पंतप्रधान मोदींकडून अपघातस्थळी पाहणी, जखमींची विचारपूस

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

अहमदाबाद विमान दुर्घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि. १३) अपघातस्थळी जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला तसेच अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमींची विचारपूस केली.


एअर इंडियाचे अहमदाबाद-लंडन विमान गुरुवारी दुपारी सरदार वल्लभभाई पटेल विमानतळावरून टेक ऑफ झाल्यानंतर अवघ्या काही सेकंदांमध्ये दुर्घटनाग्रस्त झाले. हे विमान मेघानी नगरमधील डॉक्टरांच्या वसतिगृहावर कोसळले. रात्री उशिरापर्यंत घटनास्थळावरून २६५ मृतदेह बाहेर काढण्यात आले.



या विमानात १२ क्रू सदस्यांसह एकूण २४२ प्रवासी होते. त्यांच्यापैकी केवळ एक प्रवासी बचावला. त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या वसतिगृहातील २४ जणदेखील या दुर्घटनेत मृत्युमुखी पडले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी सकाळी १० वाजता अहमदाबादमध्ये पोहचले. त्यांनी आधी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. नंतर ते अहमदाबाद सिव्हिल रुग्णालयात गेले आणि जखमींची विचारपूस केली. विमानातून प्रवास करणारा आणि अपघातातून वाचलेल्या विश्वासकुमार रमेश यांचीही पंतप्रधानांनी भेट घेत दुर्घटनेची माहिती जाणून घेतली. त्यांच्यासोबत गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, केंद्रीय नागरी विमान वाहतूकमंत्री राम मोहन नायडू, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे गृहमंत्री हर्ष संघवी उपस्थित होते.



यानंतर विमान अपघाताबाबत पंतप्रधान मोदींनी अहमदाबाद विमानतळावर अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या आढावा बैठकीत पंतप्रधानांनी अधिकाऱ्यांकडून सविस्तर अहवाल घेतला आणि पुढील कृती आराखड्यावर चर्चाही केली.

## विमानातून सीटसह बाहेर फेकला गेलो अन् बचावलो..!

### मृत्यूच्या दाढेतून वाचलेल्या विश्वासकुमार यांचा थरारक अनुभव



**या अपघातामधून मी जिवंत कसा वाचलो यावर माझाही विश्वास बसत नाही. काही क्षणांसाठी मला वाटले होते मीही मरणार, पण अपघातानंतर जेव्हा डोळे उघडले तेव्हा मी जिवंत होतो. मग मी सीटबेल्ट काढून तिथून दूर गेलो. -विश्वासकुमार रमेश**

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

अहमदाबाद येथे एअर इंडियाच्या विमानाला झालेल्या भीषण अपघातामधून भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक विश्वासकुमार रमेश सुखरूप बचावले. अपघातानंतर एका बाजूला आगीचे लोळ दिसत असताना दुसऱ्या बाजूला विश्वासकुमार विमानाच्या ढिगाऱ्यातून चालत बाहेर आले आणि स्थानिकांच्या मदतीने रुग्णवाहिकेत बसले. जखमी अवस्थेत चालत जात असलेला त्यांचा व्हिडीओही व्हायरल होत आहे. **(पान २ वर..)**

### भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक

३९ वर्षीय विश्वासकुमार रमेश हे भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक आहेत. ते आपल्या भावासह दीव येथे आले होते आणि अहमदाबादहून भावासोबत परत निघाले होते. एअर इंडियाच्या एआय १७१ या विमानात ११ए या सीटवर ते बसले होते. त्यांचा भाऊ मात्र अपघातात वाचू शकला नाही. गेल्या २० वर्षांपासून रमेश हे लंडनमध्ये त्यांच्या कुटुंबासमवेत वास्तव्यास आहेत.

## आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर यांनी मैथिली पाटीलच्या कुटुंबियांचे केले सांत्वन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेली एअर होस्टेस मैथिली पाटील हिच्या कुटुंबियांची उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी आणि पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी न्हावे येथे जाऊन भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले. मैथिलीचे वडील मोरेश्वर पाटील हे न्हावे गावचे भाजपचे बूथ अध्यक्ष आहेत. मैथिलीच्या अकाली जाण्याने न्हावे गावासह पनवेल, उरण तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.





चार दिवसांपूर्वीच मैथिली ही आजारी असल्याने घरी आली होती. त्यानंतर बुधवारी ती अहमदाबादला जाण्यासाठी निघाली. अपघाताच्या अवघ्या अर्धा तास आधी तिने आई-वडिलांशी फोनवरून संवाद साधून लंडन प्रवासाबद्दल कल्पना दिली होती तसेच लंडनला पोहचल्यावर फोन करते, असे सांगितले. तिचे हे संभाषण अखेरचे ठरले. तिच्या दुर्दैवी मृत्युमुळे दुःख व्यक्त होत आहे. **(पान २ वर..)**

## अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला

**नवी दिल्ली** : गुजरातच्या अहमदाबादमध्ये अपघातग्रस्त झालेल्या विमानाचा ब्लॅक बॉक्स शुक्रवारी (दि. १३) तपास यंत्रणांच्या पथकाला सापडला. त्यामुळे आता या विमानाच्या अपघाताचे रहस्य उलगडण्यास मदत होणार आहे. एटीएसच्या अधिकाऱ्याने सांगितले की, हा एक डिजिटल व्हिडीओ रेकॉर्डर (डीव्हीआर) आहे, जो आम्ही विमानाच्या मलब्यामधून शोधून काढला. आम्ही हा डीव्हीआर पुढील तपासणीसाठी एफएसएल टीमकडे सुपूर्द करणार आहोत.



## निवडक

### इस्त्रायलचा हल्ला, इराणचा प्रतिहल्ला; दोन देशांमधील संघर्ष वाढला

**तेहरान, जेरूसेलम** : इस्त्रायलने इराणवर 'ऑपरेशन रायझिंग लायन' अंतर्गत मोठ्या प्रमाणावर हवाई हल्ले केले असून यामध्ये इराणचे सशस्त्र दलाचे प्रमुख जनरल मोहम्मद बाघेरी आणि इस्लामिक रेव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सचे प्रमुख मेजर जनरल होसैन सलामी यांचा मृत्यू झाला आहे. इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यांना उत्तर देताना इराणने सुमारे १०० ड्रोनद्वारे हल्ला चढवला. इस्त्रायल हल्ल्याची मोठी किंमत चुकवावी लागेल, असा इशारा इराणचे सर्वोच्च नेते खोमेनी यांनी दिला आहे.

### नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटीची उभारणी

**नवी मुंबई** : क्रिएटिंग न इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी या महाराष्ट्र सरकारच्या उपक्रमांतर्गत पाच जागतिक स्तरावर प्रसिद्ध परदेशी विद्यापीठांना मुंबई आणि नवी मुंबईत त्यांच्या कॅम्पसची स्थापना करण्यासाठी इरादापत्रे प्रदान केली जाणार आहेत. यामध्ये अ‍ॅबर्डीन विद्यापीठ, यॉर्क विद्यापीठ, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी आणि इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन या विद्यापीठांचा समावेश आहे. इरादापत्र प्रदान समारंभ शनिवारी (दि. १४) मुंबईत ताज महाल पॅलेस हॉटेलमध्ये होणार आहे. **(सविस्तर वृत्त पान ६ वर..)**

## तुर्भे येथील कंपनीत गॅसगळती

### कामगारांना बाधा; रुग्णालयात दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या तुर्भे एमआयडीसीतील एका कंपनीत शुक्रवारी (दि. १३) वायूगळती झाली. डी-३२६ क्रमांकाच्या औद्योगिक युनिटमध्ये झालेल्या या घटनेत सकाळी कामावर असलेल्या महिला कामगारांना अचानक श्वास घ्यायला त्रास होऊ लागला, डोके दुखू लागले आणि काही क्षणांत २० ते २५ महिला कामगार बेशुद्धावस्थेत कोसळल्या.

प्राथमिक माहितीनुसार युनिटमध्ये वापरल्या जाणाऱ्या कार्बन मोनॉक्साईड वायूची गळती झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. एकूण २७



जणांवर विषारी वायूचा परिणाम झाला असून त्यांना वाशी येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यामध्ये बहुसंख्य महिला कामगार असून काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे.

या घटनेनंतर तुर्भे एमआयडीसी परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक पोलीस, अग्निशमन दल आणि आपत्कालीन व्यवस्थापन पथक घटनास्थळी दाखल झाले. संबंधित कंपनीतून तत्काळ काम थांबवून सर्व कामगारांना बाहेर काढण्यात आले. गॅस गळतीचा मुख्य स्त्रोत शोधण्यासाठी आणि नियंत्रणासाठी यंत्रणांनी तातडीने कार्यवाही सुरू केली.

दरम्यान, नवी मुंबई महापालिका आणि औद्योगिक सुरक्षा विभागाने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला, तर लोकप्रतिनिधी आणि माजी नगरसेवकांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली.

## रोह्यात वादळी पावसामध्ये झाड पडून घराचे नुकसान

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात गुरुवारी रात्री वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला. या पावसामुळे चणेरा विभागातील गोफण येथील पांडुरंग महादेव कोळी यांच्या घरावर झाड पडून नुकसान झाले आहे.

नुकसानग्रस्त घरात अल्केश्वर महतो, पत्नी व दोन मुले असे भाडोत्री कुटुंब राहायचे. अल्केश्वर हे कामानिमित्त बाहेर गेले होते, तर पत्नी व दोन मुले घरात होती. रात्री पावणे १२च्या सुमारास मुसळधार पाऊस व जोरदार वाऱ्यात एक झाड या घरावर पडले. या वेळी घरातील मंडळी मागच्या दाराने सुरक्षितस्थळी पळाल्याने जीवितहानी टळली. या घटनेत घराचे पत्रे, पाईप व इतर नुकसान झाले आहे. या नुकसानीचा पंचनामा चणेरा मंडळ अधिकारी प्रकाश मोकल, शेडसई प्रभारी तलाठी नंदकुमार पाटील, सरपंच कल्याणी मढवी यांच्यासमक्ष करण्यात आला. या अनुषंगाने मदतीसाठीचा प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर केला जाणार आहे.

## सुधागड तालुका भाजप संपर्क कार्यालयाचे उद्घाटन



**पाली : प्रतिनिधी**

पाली येथे अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज व भव्य असे सुधागड तालुका भाजप संपर्क कार्यालय प्रकाश देसाई यांच्या पुढाकाराने उपलब्ध झाले आहे. या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १३) करण्यात आले.

या कार्यक्रमास भाजप नेते राजेश मपारा, श्रीकांत ठोंबरे, प्रकाश देसाई, गीता पालरेचा, आलाप मेहता, दादा घोसाळकर, आरिफ मणियार, प्रणाली शेठ, पराग मेहता, नरेश खाडे, राजेंद्र गांधी, सुशील शिंदे, अजय खंडागळे, अ‍ॅड आरती गुप्ता, शिरीष सकपाळ, सरपंच प्रणिता खाडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आमदार रविशेठ पाटील म्हणाले की, भाजप जनहित आणि लोककल्याणकारी विकासकामे यांना प्राधान्य देत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस बहुसंख्य लोक, इतर पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, अनेक ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य भाजपकडे आकर्षित होत आहेत. तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या दोन्ही जागा, तर पंचायत समितीच्या चार जागा भाजप जिंकणारच. पुढे बोलताना त्यांनी या कार्यालयातून जनतेचे मूलभूत प्रश्न, समस्या सोडवल्या जातील, राज्य व केंद्र शासनाच्या जनकल्याणकारी योजना लाभार्थीपर्यंत पोहचतील, शिवाय पक्ष संघटना मजबुतीसाठी हे कार्यालय अतिशय उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. **(पान २ वर..)**

## शालेय वस्तू खरेदीची लगबग



**कर्जत : प्रतिनिधी**

येत्या सोमवारपासून म्हणजेच १६ जून रोजी नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात होत आहे. या पार्श्वभूमीवर शाळेचा गणवेश, नवीन दप्तर, वह्या, पुस्तके, कंपास पेटी, डबा, पाण्याची बाटली असे शालोपयोगी साहित्य खरेदी करण्यासाठी पालकांसह मुलांची गर्दी बाजारपेठेत दिसत आहे.

उन्हाळी सुट्टीनंतर मुलांना शाळा सुरू होण्याचे वेध लागले आहेत. नवीन वर्ग, नवीन मित्र अशा स्वप्नात रंगलेली बच्चेकंपनीची शालेय साहित्य घेण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. बाजारपेठेत सध्या शालेय वस्तू, गणवेश खरेदीसाठी दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी दिसत आहे.

अनेक दुकानात शाळेचे गणवेश, दप्तर, रेनकोट, छत्री विकत घेण्यासाठी पालकांसह विद्यार्थी दिसून येत आहेत. यंदा नवीन आलेल्या फॅन्सी स्कूल बॅग, रेनकोट खरेदीकडे विद्यार्थ्यांचा कल आहे.

## पनवेल ते श्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वारकऱ्यांना शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री संत तुकाराम महाराज पायी कोकण दिंडी सोहळ्याला नुकतीच सुरुवात झाली असून पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. १३) आकुर्ली येथे दिंडीला भेट देऊन दर्शन घेतले. ही दिंडी पनवेल येथून निघून श्री क्षेत्र देहू आणि श्री क्षेत्र पंढरपूरपर्यंत प्रवास करणार आहे.

आकुर्ली येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, तालुका चिटणीस यतीन पाटील आदी होते. त्याचबरोबर श्री संत तुकाराम महाराज पायी कोकण दिंडी आणि धर्मशाळेच्या कमिटीचे अध्यक्ष हभप पद्माकरमहाराज पाटील, उपाध्यक्ष हभप सीताराम जळे, सचिव हभप विश्वनाथ शेळके, खजिनदार हभप शंकर फडके, उपखजिनदार हभप धाऊ पाटील, उपसचिव हभप प्रभाकर नावडेकर, सदस्य हभप अनंता फडके, हभप गणेश म्हस्कर, हभप विठोबा पाटील, हभप आत्माराम पाटील, हभप राजेश पाटील, हभप राघो कडव, हभप राजेश पाटील, हभप आदिनाथ भोईर, हभप नारायण म्हात्रे, हभप बानुमाता यांच्यासह दिंडीचे पदाधिकारी आणि इतर मंडळी उपस्थित होती. शिवकर येथेही वारकरी सांप्रदायातील लोक आणि इतर मंडळी हजर होती. या वेळी भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांनी काही काळ चालत जात दिंडीत सहभाग घेतला.

या दिंडी सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. वारकऱ्यांच्या भक्तीमय वातावरणात आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिंडीतील वारकऱ्यांशी संवाद साधला आणि त्यांना प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.





# धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान

## रायगड जिल्ह्यातील ११३ गावांचा समावेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र सरकार तर्फे देशातील आदिवासी बांधवांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे. हे अभियान रायगड जिल्ह्यातील १४ तालुक्यातील ११३ आदिवासी गावांमध्ये राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यात १६ जूनपासून अभियानाला प्रारंभ होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी शुक्रवारी (दि. १३) पत्रकार परिषदेत दिली.

डीए-जेजीयूए अभियान प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय अभियानच्या (पीएम-जेएनएमएएन) धर्तीवर असून, गावपातळीवर थेट शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ आदिवासी लाभार्थ्यांपर्यंत पोहचवणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.



### अभियानासाठी निवडण्यात आलेल्या गावांची तालुकानिहाय संख्या

**उरण (२), पनवेल (१४), कर्जत (२४), खालापूर (१०), पेण (२०), अलिबाग (१३), मुरूड (२), रोहा (९), सुधागड (१०), माणगाव (२), तळा (१), श्रीवर्धन (३), म्हसळा (१), महाड (२).**

> **शासनाच्या विविध विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजन धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाच्या माध्यमातून आदिवासी गावांमध्ये राबविण्यात येणार आहे. हे अभियान रायगड जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने केली आहे.**
>
> **-किशन जावळे , जिल्हाधिकारी, रायगड**

या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. जिल्हास्तर समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी तर सह-अध्यक्ष जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असतील. प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग, पेण हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये १६ ते ३० जून या कालावधीत उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या माध्यमातून गावपातळीवर शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

या शिबिरांमध्ये आधार कार्ड, आयुष्मान भारत कार्ड, पीएम किसान सन्मान योजना, जन धन खाते, शिष्यवृत्ती कव्हरेज, उज्वला गॅस योजना, जातीचे दाखले, रहिवासी दाखले, घरकुल योजना, पीएम मातृ वंदना योजना, आरोग्य तपासणी अशा अनेक योजनांचे लाभ दिले जाणार आहेत.

अभियानासाठी रायगड जिल्ह्यातील ११३ गावांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

# गरिबांच्या घराची लढाई आम्ही अखेरपर्यंत लढू -मंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरातील झोपडपट्टीधारकांच्या घरांचा लढा आम्ही अखेर पर्यंत लढू, अशी ग्वाही मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड आशिष शेलार यांनी आज दिली.



संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील केतकी पाडा, जानू पाडा, पिंपरी पाडा या भागातील रहिवासी प्राथमिक सुविधां पासून वंचित असून आज उपनगर पालकमंत्री ॲड आशिष शेलार यांनी पाहणी करुन रहिवाशांशी संवाद साधला. तसेच रहिवाशांनी सुरु केलेल्या स्वाक्षरी मोहीमेला शुभारंभ केला.

यावेळी त्यांच्या सोबत माजी खासदार गोपाळ शेट्टी, आमदार प्रवीण दरेकर, संजय उपाध्याय, जिल्हा अध्यक्ष बाळा तावडे, गणेश खणकर आणि भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री शेलार म्हणाले की,दहिसर आणि मालाड, गोरेगावपर्यंत वन विभागाच्या जागेवरील असलेल्या माझ्या मुंबईकर झोपडपट्टीयवासियांच्या घरांचा आणि दुकानांचा प्रश्न प्रलंबित आहे. त्यांच्यावर टांगती तलवार असल्याने याबाबतची कारवाई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रस्तावित आहे.

हे मुंबईकर या जागेवर वन घोषित होण्याआधी पासून राहत आहेत. आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे, डिक्शनरीच्या व्याख्येप्रमाणे येथे वन (जंगल) नाही म्हणून सदर संपूर्ण भूभाग यावर या झोपडपट्टी आणि मुंबईचा राहतात तो पूर्ण विभाग आणि जागा वनातून वगळण्यात यावा असा ठराव जिल्हा नियोजन समितीने पारित केला.

या पुनर्विकासाच्या बाबतीत हा विषय घेऊन आम्ही सगळे गेलो आणि मुख्यमंत्र्यांनी सुद्धा ती जागा वन अघोषित करावी यामध्ये संपूर्ण ८० हजाराच्या वर वनविभागातील झोपड्यातील मुंबईकरांचं पुनर्विकास व्हावा या पद्धतीच्या प्रस्तावाची भूमिका मंजुरी दिली. आता त्याला सर्वोच्च न्यायालयात पुढे आणि केंद्रीय मंत्रालयासमोर पुढे बळ मिळवण्यासाठी लोकसभागाच्या स्वाक्षरी अभियानाचा शुभारंभ आज या ठिकाणी केला.

## नवी मुंबईत अनधिकृत फेरीवाले, खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कारवाई

**नवी मुंबई : बातनीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यावर / पदपथावर असलेले अनधिकृत फेरीवाले तसेच रस्त्यावर खाद्यपदार्थ तयार करुन त्याची विक्री करणारे खाद्यपदार्थ विक्रेते यांच्यावर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली व उप आयुक्त



अतिक्रमण डॉ. कैलास गायकवाड यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आठही विभाग कार्यालयांतर्फे दि.१२ व १३ जून या दोन्ही दिवशी धडक कारवाई करण्यात आली.

या कारवाईत आठही विभागांच्या क्षेत्रात अनधिकृतपणे व्यवसाय करणा-या एकूण १९० विक्रेत्यांवर तसेच १५६ खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कार्यवाही करुन १५६ गॅस सिलेंडर, ६७ शेगड्या त्याचप्रमाणे खाद्यपदार्थ बनविण्याचे साहित्य, १९ हातगाड्या जप्त करण्यात आल्या व त्या डंपिंग यार्डला जमा करण्यात आल्या.

रस्त्यावर खाद्यपदार्थ विक्रीमुळे होऊ शकणा-या अनेक आजारांना आळा घालण्याच्या दृष्टीने तथा अपघात टाळण्याच्या दृष्टीने सर्वच विभागांना दक्ष राहण्याचे निर्देश आयुक्त महोदयांनी दिलेले असून, त्यानुसार सर्व विभाग कार्यालये निरंतर कारवाया करण्यास तसेच जप्ती, गुन्हे दाखल करण्यास सज्ज आहेत.

## 'अलिबाग-वडखळ महामार्गावर अवजड वाहतुकीचे नियमन करणार'

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग वडखळ महामार्गावर शनिवार रविवार आणि सुट्टीच्या दिवशी होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन या मार्गावरील अवजड वाहतुकीचे नियमन केले जाईल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे. पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून याबाबतचा प्रस्ताव घेऊन या संदर्भातील वाहतूक नियमन अधिसूचना काढली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



दर विकेंडला अलिबागमध्ये हजारो पर्यटक येत असतात. त्यामुळे अलिबाग वडखळ राष्ट्रीय महामार्गावर वाहनांची संख्या अचानक वाढते. त्यामुळे दर शनिवार रविवारी महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा पहायला मिळतात. २५ किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी दिड ते दोन तासांचा कालावधी लागतो. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडतो. वाहनचालक आणि प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो. बेशिस्त वाहन चालक आणि अवजड वाहने या वाहतूक कोंडीच्या समस्येत अधिकच भर काढत असतात. ही बाब लक्षात घेऊन शुक्रवार, शनिवार आणि रविवार या तीन दिवसांच्या कालावधीत या मार्गावरील अवजड वाहतूकीचे नियमन करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

वडखळकडून अलिबागच्या दिशेने येणारी आणि अलिबागकडून वडखळच्या दिशेने जाणारी अवजड वाहतूक विकेंण्डच्या दिवशी नियंत्रित केली जाणार आहे अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे. पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून या संदर्भातील प्रस्ताव मागविण्यात आला असून, हा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर वाहतूक नियमन अधिसूचना प्रसिध्द केली जाईल असेही त्यांनी सांगीतले. यामुळे वाहतूक कोंडीची समस्या काही प्रमाणात सुटू शकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार; आरोपीला बेड्या

**कर्जत : प्रतिनिधी**

लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार करणाऱ्या तरुणास कर्जत पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गुंडेगे येथील राहणारी फिर्यादी तरुणीला गावातीलच तरुणाने प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तिला लग्नाचे आमिष दाखवले होते. यानंतर आरोपी तरुणाने पीडितेच्या घरी भेट घेत तिच्या मनाविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित केले होते. मात्र आता तरुणाने पीडितास लग्न करण्यास नकार दिल्याने याबाबत पीडित तरुणीने कर्जत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून त्या तरुणाला अटक करण्यात आली आहे


कर्जत पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या कर्जत शहरांमधील गुंडेगे परिसरात पीडित फिर्यादी तरुणी आणि आरोपी तरुण राहत आहे. आरोपी तरुणाने २०१६ मध्ये फिर्यादी तरुणीची ओळख निर्माण करीत तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले होते. या दरम्यान आरोपीने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवले व वेळोवेळी तिच्या सोबत राहते घरात तिच्या संमतीविना जबरदस्ती शरीर संबंध केले. मात्र आरोपी तरुणाने १ मे २०२५ रोजी पीडितेस लग्नास नकार देत तिची फसवणूक केली होती. फिर्यादी पीडित तरुणीने आरोपी तरुणाच्या विरोधात कर्जत पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ६९ प्रमाणे गुन्हा तरुणाच्या विरोधात दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलिस अधिकारी मनीषा लटपटे हे करीत आहेत. सदर आरोपी तरुणाच्यावर या आधी देखील कर्जत पोलिस ठाण्यात विविध गुन्ह्यांची नोंद आहे. या प्रकरणी महिला पोलिस अधिकारी मनीषा लटपटे तपास करीत आहेत.

## ब्लॅकमेल करून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार, दोन जण अटकेत

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यात पोक्सो गुन्हे अंतर्गत आणखी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.१४ वर्षीय अल्पवयीन मुली बरोबर २५ वर्षीय तरुणाने इन्स्टाग्रामवर मैत्री केली.त्यानंतर या तरुणाने तीला अश्लील मॅसेज पाठविले. चॅटिंग केलेले अश्लील मॅसेज मुलीच्या एक्स बॉय फ्रेंडच्या हाती लागल्यानंतर त्याने पीडित अल्पवयीन मुलीला सदर अश्लील मॅसेज व्हायरल करण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल करुन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा संतापजनक प्रकार घडला आहे.या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. सदर घटना रोहे तालुक्यातील उसर गावात घडली असून रोहा पोलिसांनी बुधवारी रात्री दोन्ही आरोपिंना बेड्या ठोकल्या आहेत.



याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार,उसर गावातील १४ वर्षीय मुलीने इन्स्ट्राग्रामवर अकाउंट सुरु केले होते.आरोपी ओमकार संजय पिंपळे ( वय २५ रा. तळवली ता. रोहा ) याने सदर तरुणीला इन्स्टाग्रामवर अश्लील मॅसेज केले होते.हे मॅसेज त्या पीडित तरुणीचा एक्स बॉय फ्रेंड असलेला दुसरा आरोपी देवेश रवींद्र सावंत ( वय २५ रा. नागोठणे ता.रोहा ) याच्या हाती लागले.आरोपी देवेश सावंत याचे आणि पीडित मुलीचे प्रेम संबध होते. पण गावात या विषयाची माहिती समजल्यानंतर प्रेम संबंध तोडले होते.

ओमकार पिंपळे याने पाठवलेले अश्लील मॅसेज मी सर्वत्र व्हायरल करेन अशी धमकी देऊन पीडित अल्पवयीन मुलीला ब्लॅकमेल करुन उसर गावातील गणेश गावडे यांच्या बंद अवस्थेत असलेल्या घरात नेऊन तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. सदर घटना कोणाला सांगितलीस तर तुला मारून टाकेन अशी धमकी देखील त्या आरोपीने दिली.

उसार गावात सुट्टी निमित्त आलेल्या पीडित मुलीने घडलेली सर्व घटना आपल्या आईला सांगितली. त्यानंतर घरच्या मंडळींनी थेट पोलीस ठाण्यात धाव घेत दोन्ही आरोपी विरोधात तक्रार दिली.पोलिसांनी दोन्ही आरोपी विरोधात बालकांचे लैंगिक अत्याचार, विनयभंग आदी गुन्हे अंतर्गत गुन्हा दाखल करुन दोन्ही आरोपीना बुधवारी रात्री अटक केली आहे.रोहा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

पान १ वरून

## आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर यांनी मैथिली पाटीलच्या कुटुंबियांचे केले सांत्वन

न्हावे येथे पाटील कुटुबियांच्या सांत्वनपर भेटीवेळी उरणचे आमदार महेश बालदी यांनी, देशावर आलेल्या या संकटात आमच्या परिसरातील कन्यादेखील दुर्दैवाने आम्हाला सोडून निघून गेली, ही घटना अत्यंत वेदनादायी आहे. अहमदाबादमध्ये ओळख पटवण्यासाठी मैथिलीचे आई-बाबा पोहचले आहेत. डीएनए मॅच झाल्यानंतर मृतदेह ताब्यात मिळण्याची अपेक्षा आहे. मी स्वतः या संपूर्ण घटनेवर लक्ष ठेवून आहे. गरज भासल्यास अहमदाबादमध्ये जाण्याच्या तयारीतही आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

आमदार प्रशांत ठाकूर यांनीही आपल्या संवेदना व्यक्त करताना मैथिलीने केलेल्या कामाचा अभिमान वाटत असतानाच काही काळातच तिच्या बाबतीत शोक व्यक्त करण्याची वेळ येणे हे खूप दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. पाटील कुटुंबावर ओढवलेल्या दुखाःतून सावरण्याची ताकद ईश्वर त्यांना देवो, अशी प्रार्थना केली.

## विमानातून सीटसह बाहेर फेकला गेलो अन् बचावलो..!

अपघातग्रस्त विमानातील २४२ लोकांपैकी विश्वासकुमार रमेश एकमात्र वाचू शकले, पण हा चमत्कार कसा घडला? विश्वासकुमार विमानाच्या बाहेर कसे पडले? याबाबत त्यांनीच माहिती दिली. डीडी न्यूजशी बोलताना आणि अपघातानंतर डॉक्टरांना दिलेल्या माहितीवरून काही बाबी समोर आल्या आहेत.

रुग्णालयात पोहचल्यानंतर विश्वासकुमार रमेश यांनी डॉक्टरांना सांगितले की, विमानाच्या उड्डाणानंतर काही सेकंदातच अपघात घडला आणि विमान वसतिगृहाच्या इमारतीला जाऊन आदळले. विमान जिथून तुटले, तिथेच ११ए या सीटवर मी बसलो होतो. माझ्या सीटजवळच एक्झिट डोअर होते. त्यातून वेळीच बाहेर पडल्यामुळे वाचू शकलो. मी बाहेर पडल्यानंतर विमानाचा स्फोट झाला.

'मी विमानातून उडी मारली नव्हती. तर माझ्या सीटसह मी फेकला गेलो. मी जिथे पडलो, तेथील जागा सपाट होती. मी सीट बेल्ट काढला आणि आजूबाजूला नजर टाकली. जमिनीवरच असल्यामुळे मी एक्झिट डोअरमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला', अशी माहिती विश्वासकुमार यांनी डीडी न्यूजशी बोलताना दिली. माझ्या विरुद्ध बाजूला एक भिंत असल्यामुळे तिथल्या लोकांना विमानातून बाहेर पडणे शक्य झाले नसावे. माझ्या नजरेसमोरच दोन एअर होस्टेस आणि एक वृद्ध जोडप्याचा मृत्यू झाला होता, असेही त्यांनी सांगितले.

## सुधागड तालुका भाजप संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

प्रलंबित असलेल्या रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदासंदर्भात आमदार पाटील यांनी म्हटले की, पालकमंत्रिपदावर राष्ट्रवादी आणि शिवसेना यांचा दावा आहे, मात्र या दोन पक्षांमधील तिढा काही केल्या सुटत नाहीये. महायुतीतील भाजप सर्वांना सोबत घेऊन जाणारा पक्ष आहे. त्यामुळे रायगडचे पालकमंत्रीपद भाजपला देण्यात यावे, अशी विनंती आपण मुख्यमंत्र्यांकडे करणार आहोत.

प्रकाश देसाई म्हणाले की, सुधागड तालुक्यात भाजपला सुगीचे दिवस आले आहेत. जुने, ज्येष्ठ, नवे कार्यकर्ते भाजपच्या प्रवाहात जोमाने काम करीत आहेत. आगामी निवडणुकांच्या दृष्टीने पोषक वातावरण तयार झाले असून भाजपचा रथ आता वेगाने पुढे चालला आहे. सबका साथ सबका विकास हा नारा घेऊन जाणाऱ्या भाजपशिवाय आता पर्याय नाही.

## नेरूळ रेल्वेस्थानकातून लोकलच्या फेऱ्या वाढवण्याची, एक्सेलेटर बसवण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरुळ रेल्वे स्थानकातून (जक्शन) ट्रेनच्या फेऱ्यात वाढ करण्याबरोबरच स्थानकात एस्केलेटर बसवण्याची मागणी नेरुळ रहिवाशी संघाने स्थानिक खासदार नरेश म्हस्के आणि रेल्वे प्रशासन यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे.




नेरुळ रेल्वे (जक्शन ) स्थानकाचा वापर करणाऱ्या दैनंदिन प्रवाशांच्या वाढत्या संख्येच्या अनुषंगाने हार्बर आणि ट्रान्स हार्बर रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे निवेदन देण्यात आले आहे. नेरुळ रेल्वे स्थानक आता ठाणे, मुंबई, उरण, उलवे आणि पनवेल येथील रहिवाशांसाठी एक महत्त्वाचे जंक्शन बनले आहे.

या भागातील निवासी प्रकल्पांची संख्या आणि वाढत्या लोकसंख्येमुळे, नेरुळ स्थानकावरील प्रवाशांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. गर्दीच्या वेळेत - विशेषतः सकाळी आणि संध्याकाळी सध्याची ट्रेन वारंवारता (फेरी) प्रवाशांचा भार हाताळण्यासाठी अपुरी आहे. यामुळे प्रचंड गर्दी होते आणि दैनंदिन प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे नेरुळ रहिवाशी संघांचे अध्यक्ष स्वप्निल घोलप यांनी निवेदनात म्हंटले आहे.

सदर निवेदनात ट्रेनची वारंवारता दोन्ही दिशांना म्हणजे नेरुळ स्थानकातून उलवे, उरण, पनवेल, ठाणे , छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलला लोकल गाड्यांची वारंवारता वाढवावी अशी मागणी केली आहे. तसेच नेरुळ स्थानकातून ज्येष्ठ नागरिक मोठया संख्येने ये-जा करतात. तथापि, एस्केलेटर अभावी त्यांच्या सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

त्यासाठी एस्केलेटर मुख्य प्रवेश आणि निर्गमन बिंदू आणि स्टेशनंवरील पादचारी पुलावर बसवावेत अशी मागणी नेरूळ रहिवासी संघाचे अध्यक्ष स्वप्निल घोलप, संतोष थोरात, प्रतीक यादव, सुधीर फापाळे, केशव बने, गजानन जाधव, उदय साळवी आदिनी केली आहे

## निवडक

### आपटा येथे वीज पडून नुकसान



**पनवेल :** आपटा येथे गुरुवारी रात्री उशिरा जोरदार पाऊस व जोरदार वारा व विजेचा कडकडाट झाला होता. याचवेळी आपटा येथील दिलीय मोरे यांच्या घराबाहेर असलेल्या झाडावर वीज कोसळली व झाडाची मोठी फांदी तुटून खाली पडली. या वेळी घरातील सर्व लहान मुले मोठी माणसे घाबरली. दरम्यान, वीज पडल्यामुळे पंखा जळला आणि भिंतीवरील सिंमेट तुटून खाली पडले.

### पनवेलमधून मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** रेल्वेस्टेशन बाहेरील मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. राजु कृष्णा रेड्डी यांनी त्यांची ४०,००० रुपये किमतीची (एमएच ४६ सी ४००५) मोटरसायकल पनवेल रेल्वेस्टेशन बाहेरील मोकळ्या जागेत उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेल परिसरात स्टॉप डायरिया मोहीम

## नियोजनासाठी महापालिका मुख्यालयात बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पाच वर्षांखालील बालकांमध्ये डायरियामुळे होणारे मृत्यू पूर्णपणे थांबविण्याचे उद्दिष्ट ठेऊन 'स्टॉप डायरिया (अतिसार) मोहीम' देशभरात राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत झिंक आणि ओआरएसचा प्रभावी वापर, पालकांमध्ये योग्य माहिती व सवयी रुजविणे, तसेच गरजू व संवेदनशील भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

महापालिका कार्यक्षेत्रात ही मोहिम यशस्वीरित्या राबविण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि.१३) महापालिका मुख्यालयात उपायुक्त डॉ. वैभव



विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकिस माता बाल आरोग्य अधिकारी डॉ. गणेश नाईक, वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, महापालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी, आशा सेविका उपस्थित होत्या.

एकही बालकाचा अतिसारामुळे (डायरिया) मृत्यू होऊ नये यासाठी 'स्टॉप डायरिया' ही मोहीम राबविण्यात येत असून, या मोहिमेंतर्गत ज्याप्रमाणे महापालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील ओआरएस व झिंक कॉर्नर आहेत त्याप्रमाणे महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व अंगणवाड्यामध्ये ओआरएस व झिंक कॉर्नर उभारण्याबाबत उपायुक्तांनी निर्देश दिले तसेच अतिसार होऊ नये यासाठी प्रसार माध्यमातून जनजागृती करण्याबाबत उपायुक्तांनी सूचना दिल्या.

पाच वर्षांखालील बालकाला (उपचारासाठी) डायरिया सुरू होताच लगेचच ओआरएस द्यावे. झिंक सलग १४ दिवस द्यावे. आईने स्तनपान सुरू ठेवावे. उकळून शुध्द केलेले पाणी पिण्यास वापरावे. बालकाची लघवी व विष्ठा नीट साफ करावी. स्वयंपाक करताना हात स्वच्छ धुवावेत.

या लसीकरणांतर्गत महापालिकेच्या वतीने मिझल्स व रुबेला लसीचे दोन्ही डोस न मिळालेल्या, अपूर्ण किंवा गाळले गेलेल्या लाभार्थ्यांना शोधून त्यांचे लसीकरण करण्यात येणार आहे. तसेच मिझल्स व रुबेला निर्मूलनासाठी विशेष लसीकरण मोहीम राबवण्यात येणार आहे.

**खालील लक्षणे दिसल्यास त्वरित आरोग्य केंद्रात जावे**

मुलाची तब्येत अधिक बिघडणे, पाणी पिण्यास किंवा दूध पिण्यास नकार, विष्ठेत रक्त, ताप येणे.

**मिझल्स व रुबेला लसीकरणाबाबत चर्चा**

भारत सरकारने २०२६पर्यंत देशातून मिझल्स आणि रुबेला या आजारांचे निर्मूलन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या वतीने मिझल्स व रुबेला निर्मूलन मोहीमेचा प्रारंभ करण्यात आला आहे. या मोहिमेंतर्गत MR-१ आणि MR-२ लसीकरणावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

## झोपलेल्या व्यक्तींचे मोबाईल चोरणारा अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील साईकृपा धाब्याच्या समोर सर्व्हिस रोडवर ट्रक मध्ये झोपलेल्या व्यक्तीच्या मोबाईलची चोरी तसेच टायर पंम्चर काढणारे दुकानात झोपलेल्या दोघांचे मोबाईल चोरणाऱ्या गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

विशाल कुमकर (वय ३३) हे ट्रक मध्ये झोपलेले असताना कोणी तरी अज्ञात चोरट्याने त्याच्या खिशातील ८,००० रुपये किमतीचा विवो कंपनीचा फोन चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. तसेच टायर पंम्चर काढणारे दुकानात झोपलेल्या दोघांचे मोबाईलसुद्धा चोरीस गेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती.

यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, हवालदार अमोल पाटील, विशाल दुधे, महेश पाटील, परेश बोरशे, किरण कराड, संदेश म्हात्रे आदींच्या पथकाने आरोपी तोहिद ताजुद्दीन शेख (वय २१) याला ताब्यात घेतले असून त्याचा सहकारी पसार झाला आहे. त्याचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.



**पनवेल : डेहराडून (उत्तराखंड) येथे होणाऱ्या ऑल इंडिया ओपन शूटिंग चॅम्पियनशिपसाठी रायगडभूषण राजू मुंबईकर यांची निवड झाली आहे. त्याबद्दल त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी श्री साई देवस्थान साई नगर वहाळचे संस्थापक अध्यक्ष रविशेठ पाटील उपस्थित होते.**

## साहित्य पाठविण्याचे आवाहन

**उरण : बातमीदार**

उरण येथून गेली २९ वर्षे नियमित प्रकाशित होणाऱ्या झुंजार मत दिवाळी अंकासाठी राज्यभरातील साहित्यिकांकडून साहित्य मागविण्यात येत आहे. यावर्षी झुंजार मतच्या वतीने २९वा दिवाळी अंक प्रकाशित होणार आहे.

या दिवाळी अंकामध्ये ग्रामीण बाजावर आधारित साहित्याला विशेष प्राधान्य देण्याबरोबरच ऑपरेशन सिंदूर बाबतच्या कथा, ग्रामीण बाजावर आधारीत कथा, महिला अत्याचार रोखण्यासाठी करावयाच्या उपाय योजनांवरील विशेष लेख, आणखी किती वैष्णवी हगवणेंनी जीवन संपवायचे, शेतकऱ्याची आत्मकथा, जमिनी ओरबाडताय तर मग जगायचे कसे?, धर्म कुठे सांगतो की आतंकवादी बना, होय मी पोटासाठी माझे शरीर विकते, पोटासाठी नाचते मी परवा कुणाची आदी विषयांवरील लेख, कविता, सामाजिक लेख, चूटकूले तसेच ग्रामीण भागातील सणवार, रूढी परंपरा आणि पर्यटन, शेतीवरील ग्रामीण क्षेत्रातील विविध प्रयोग, ग्रामीण भागातील आजीबाईच्या बटव्यातील औषधे, जत्रा पालख्यांची मजा, विनोदी साहित्य आदी प्रकारचे लिखाण करणार्या साहित्यिकांनी साहित्य पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

साहित्यिकांनी आपले साहित्य १७ ऑगस्ट २०२५ पुर्वी मिळेल अशा बेताने संपादक अजित पाटील, आई निवास, खोपटे, पाटील पाडा, कोप्रोली, ता. उरण पिन कोड ४१०२०६ या पत्त्यावर किंवा युनिकोड मराठी फॉन्टध्ये टाईप केलेले लिखाण ajitdadapatil@gmail.com या इमेल आयडीवर पाठवावे, असे आवाहन या निमित्ताने करण्यात आले आहे. साहित्यिकांनी साहित्य पाठविताना आपला पुर्ण पत्ता आणि एक फोटोदेखील पाठवावा, असे आवाहन झुंजार मतच्या वतीने करण्यात आले आहे.



**पनवेल : भाजप कामगार मोर्चाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष शैलेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हाध्यक्ष राजेश पाटील, उपाध्यक्ष किशोर मोरे, वसंत मोरबाळे, पनवेल तालुका अध्यक्ष जितेंद्र निंबाळकर, चिटणीस जयंता घरत आदी उपस्थित होते.**

## सुरक्षा रक्षकाच्या केबिनची तोडफोड

**पनवेल : वार्ताहर**

तळोजामधील काही टवाळखोरांनी सेक्टर-१० मधील मैदानातील सुरक्षा रक्षक केबिन फोडले आणि खिडक्यांच्या काचा मैदान, पदपथावर टाकण्यात आल्या आहेत.

सिडकोने तळोजा सेक्टर-१० मध्ये खेळाचे मैदान विकसित करून पनवेल पालिकेकडे हस्तातंरित केले आहे, मात्र मैदानातील खेळणी गायब झाली आहेत. या पार्श्वभूमीवर पालिकेच्या उद्यान विभागाकडून खारघर आणि तळोजामधील उद्यान आणि मैदानाच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करून त्यासाठी केबिन उभारली आहे, मात्र ही केबिनची काही टवाळखोरांनी बॅट आणि दगडाने केबिन फोडली आहे. केबिनच्या खिडक्यांच्या काचा मैदान आणि पदपथावर टाकल्यामुळे मुलांना दुखापत होऊ शकते.

# अभिनय प्रशिक्षण शिबिर मनपाची सांस्कृतिक नांदी

रिल्स आणि शॉट्सच्या जमान्यात ज्याच्या हातात मोबाईल तो कलाकार आहे. या कलाकाराला आकार देण्यासाठीची सुरूवात पनवेल महापालिकेने केले आहे. पनवेल नगरीत नाटक, चित्रपट आणि मालिका या क्षेत्रात काम करण्यास इच्छूक मंडळींची संख्या भरपूर आहे, परंतू त्यांना अभिनयाची प्राथमिक ओळख करून घ्यायची असेल किंवा त्यातील ज्ञान हवे असेल तर मुंबईची वाट धरावी लागते. यामध्ये लहान मुलांना अभिनय शिबिरांना मुंबईला नेणे आणणे वाटते तेवढे सोपे नाही. याच पार्श्वभूमीवर पनवेलच्या सांस्कृतिक चळवळीचे बळकटीकरण करण्यासाठी नुकताच महापालिकेने अभिनय शिबिराचा उपक्रम राबविला. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच अशा पध्दतीने घेतलेल्या शिबिराला भरभरून प्रतिसाद मिळाला.

पनवेल महानगरपालिकेच्या आजवरच्या वाटचालीमध्ये समाजातील सर्व घटकांना सामावून घेऊन त्याच्यासाठी महत्वपूर्ण उपक्रम राबविण्याचा आयुक्त मंगेश चितळे यांचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. त्याचाच एक भाग म्हणजे पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पनवेलचे अध्यक्ष तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सहकार्यातून घेण्यात आलेले हे 'अभिनय शिबिर' होय.

महानगपालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात २३ मे पासून या शिबिराची सुरुवात झाली. या शिबिरामध्ये नाट्य व सिनेक्षेत्रातील दिग्गज मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

पनवेलमधील नाट्यकलावंतांना अभिनयासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांचा विकास होण्यासाठी योग्य प्रशिक्षण मिळावे याकरिता सर्वांसाठी विनामूल्य असे हे अभिनय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. अभिनयाची एबीसीडी शिकण्यासाठी ४० प्रशिक्षणार्थींचा लहान गट व ४० प्रशिक्षणार्थींचा मोठा गट तयार करण्यात आला होता. यांना नाट्य प्रशिक्षकांनी भरभरून ज्ञान दिले.

नाट्य, सिनेक्षेत्रातील मान्यवर या शिबीराचे प्रशिक्षण म्हणून लाभले. यामध्ये संजय हळदीकर (सोलापूर), रवी धुतडमल (एनएसडी दिल्ली),संकेत खेडकर (माईम थिएटर), अमोल भावे (ठाणे) अशोक केंद्रे (मुंबई), मनोज चिनाडे (मुंबई) आदी तसेच इतरही दिग्गज कलावंताचे मार्गदर्शन या शिबीरात झाले.

अभिनयासाठी एकाग्रता, निरिक्षण व कल्पनाशक्ती महत्त्वाची असते. यांचा यथायोग्य उपयोग निश्चितच सादरीकरणात होत असतो. याचबाबत सविस्तर मार्गदर्शन या अभिनय शिबिरामध्ये ज्येष्ठरंगकर्मी, नाटककार, प्रशिक्षक संजय हळदीकर यांनी केले. याबरोबर श्री. हळदीकर यांनी सिनियर व जूनियर दोन्ही गटांमध्ये सादरीकरणपद्धती, सुसुत्रता, नाट्य अभिनयाचे सौंदर्यशास्त्र, वाचिक अभिनय आणि शैली यांची प्रात्यक्षिके, मार्गदर्शन आणि सैद्धांतिक आधार याबाबतचे महत्त्वपूर्ण प्रशिक्षण दिले तर ज्येष्ठ रंगकर्मी मूक अभिनयाचे अभ्यासक संकेत खेडकर यांनी शिबिरार्थींना मूक अभिनय हा अभिनयासाठी प्रबळस्थान आहे, असे सांगत मूक अभिनय शिकवून बोलके केले. त्यांनी मुकाभिनयाची मूलतत्वे, अभिनेत्याने नाटकात शरीर भाषेचा उपयोग कसा करावा, शरीर भाषेचा उपयोग करून अभिनेत्याने विचार, विषय आणि गोष्ट प्रभावीपणे कशी पोहचवावी याविषयी प्रात्यक्षिके आणि मार्गदर्शन केले. डॉ. जयंत शेवतेकर यांनी अभिनयाची एबीसीडी व नवरस समजावून दिले आणि अमोल भावे यांनी सिनेमा व टिव्ही सिरीयलसाठी अभिनय करताना करावयाचा आवश्यक बदल व ऑडीशन याबाबत मार्गदर्शन केले. या शिबिराचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे यात वय वर्षे ७ ते ६० पर्यंतचे प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. या शिबिरादरम्यान प्रशिक्षार्थींचा उत्साह वाखाणण्यासारखा होता. प्रशिक्षकांनी सांगितलेल्या गोष्टी सादर करण्यासाठी सर्वांची सातत्याने धडपड असायची. प्रशिक्षकांनीदेखील रोज सहा-सहा तास मेहनत घेऊन प्रशिक्षाणार्थींना शिकविले. शेवटच्या दिवशी दहा-पंधरा मिनीटाच्या नाटिकेच्या माध्यमातून आणि एका समूहगीताच्या माध्यमातून प्रात्यक्षिक सादर केले.

२३ मे सुरू झालेल्या या शिबिराचा समारोप ३० मे रोजी करण्यात आला. या कार्यक्रमास अखिल भारतीय नाट्यपरिषद, शाखा पनवेल अध्यक्ष तथा आमदार प्रशांत ठाकूर, बाल रंगभूमी परिषद उपाध्यक्ष तथा नाट्यपरिषदेच्या कार्यकारणी सदस्य प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर, अखिल भारतीय नाट्य परिषद, शाखा पनवेलचे उपाध्यक्ष तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अभिनेते प्रकाश राणे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त मंगला माळवे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे कार्यवाहक शामनाथ पुंडे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये मोठ्या गटातील उत्साही प्रशिक्षणार्थींनी आपल्या मनोगत व्यक्त करताना सात दिवस शिबिरात शिकविलेल्या गोष्टी कवितेतून सादर करीत सर्व उपस्थितांना भावूक केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल कार्यक्षेत्रात उत्तमोत्तम कलाकार बनावेत अशा शुभेच्छा देऊन यासाठी महापालिकेने व पनवेल नाट्य परिषद शाखेने अभिनय शिबिर घेतल्याबद्दल खास अभिनंदन केले. भविष्यात नक्कीच या अभिनय शिबिराचा सर्व प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष भरपूर फायदा होईल. यानिमित्ताने महापालिका सांस्कृतिक चळवळ उभी करून नवीन पायंडा पाडत असल्याचेही त्यांनी सांगितले. खरोखरच हे शिबिर मनपासाठी सांस्कृतिक नांदी ठरेल, असे वातावरण तयार होत आहे.

तर अखिल भारतीय नाट्य परिषद, शाखा पनवेलचे उपाध्यक्ष तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या अभिनय शिबीराच्या माध्यमातून पालिका जनतेशी संवाद साधण्याचा प्रयत्न करते आहे. जनतेसोबत जाऊन सर्वांशी पालकया नात्याने जवळ जात आहे. मराठी नाट्य संस्कृती रूजावी, संस्कृती बहरावी यासाठी महापालिका प्रयत्न करत असल्याने आनंद होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सर्व शिबिरार्थींना नाट्यशास्त्राची ओळख हे पुस्तक भेट दिले. या शिबिराप्रमाणे लवकरच खारघर परिसरातही अशा प्रकारच्या अभिनय प्रशिक्षण शिबिराच्या आयोजन करण्याबाबत सूचित केले.

चित्रनगरी मुंबईच्या शेजारी असलेल्या आपल्या पनवेल शहराचा सांस्कृतिक वारसा वृध्दीगंत होण्यामध्ये अभिनय शिबिर हे पहिले पाऊल असून या पनवेल महानगरपालिकेने सुरू केलेली ही सांस्कृतिक नांदी आहे. भविष्यात याच पध्दतीने महापालिका विविध उपक्रमांच्या माध्यमातून सांस्कृतिक चळवळ अधिक सदृढ करण्यावरती भर देणार आहे.

**-पनवेल महापालिका जनसंपर्क विभाग**






## वॉर्डबॉयचा अपघाती मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

मैदानाशेजारी रस्त्यावर पनवेल महापालिकेच्या वैद्यकीय विभागात कामावर जाणाऱ्या एका वॉर्डबॉयचा अपघाती मृत्यू झाला. नेमका अपघात कशामुळे झाला याचा शोध खारघर पोलीस घेत आहेत.

या अपघातामधील मृत वॉर्डबॉयचे नाव राहुल रमेश उलवेकर (वय ३४) असे आहे. उलवेकर हे नावडे गावात राहत होते. मागील अनेक महिन्यांपासून ते महापालिकेच्या दवाखान्यात वॉर्डबॉयचे काम करत होता. सकाळी राहुल हे नावडे येथून दुचाकीवरुन महापालिकेच्या ओवे गावातील वैद्यकीय नागरी आरोग्य केंद्रावर जात असताना त्यांचा अपघात झाला. अपघाताचे नेमके कारण पोलिसांना समजू शकले नाही. रमेश यांची दुचाकी अचानक फरफटत गेली.

यामध्ये राहुल यांच्या डोक्यावर जबर मार लागला. याच रस्त्याने जाणाऱ्या एका रिक्षाचालकाने मदत करून त्यांना रुग्णालयात दाखल केले. जखमी अवस्थेत राहुल यांना मेडिकव्हर या रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु तेथील डॉक्टरांनी तपासल्यावर राहुल यांना मृत घोषित केले.

## चित्र रेखाटून मैथिली पाटीलला श्रद्धांजली

**उरण : बातमीदार**



मैथिली पाटील ही न्हावा गाव पनवेल येथील रहिवासी असून हालाखीच्या परिस्थितीत तिने शिक्षण घेतले. दोन वर्षांपूर्वी एअर इंडियात रुजू झाली, मात्र अहमदाबाद विमान अपघातात तीचा मृत्यू झाला. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तिला भावपुर्ण श्रद्धांजली वाहिली.

उरणमधील सारडे गावचे प्रसिद्ध चित्रकार कुणाल पाटील यांनी कोळसा, पेन, पेन्सिल, कागद या साहित्याचा वापर करून मैथिलीचे चित्र रेखाटून कुणाल पाटील यांनी भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. मैथिली हिच्या मृत्यूने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर कुणाल पाटील यांनी मैथिली हिचे चित्र रेखाटून भावपुर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. या चित्रात कुणाल पाटील यांनी मैथिलीचे हुबेहूब चित्र काढले असून चेहऱ्यावरील हाव भाव उत्तमरित्या रेखाटले आहे.

## काळसेकर कॅम्पसमध्ये वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




अंजुमन-इ-इस्लाम काळसेकर टेक्निकल कॅम्पस (AIKTC), नवीन पनवेल येथे जागतिक पर्यावरण दिन २०२५ उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून कॅम्पस परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम आयोजित करण्यात आला.

या उपक्रमाचे नेतृत्व डॉ. रमजान खाटिक, कँपस डायरेक्टर, यांनी केले. या वेळी डॉ. राजेंद्र मागर, प्राचार्य, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, डॉ. शारिक सय्यद, प्राचार्य, स्कूल ऑफ फार्मसी, डॉ. अबुसुफयान शेख, विभागप्रमुख, डी. फार्मसी, प्रा. इंशाह शेख, कंट्रोलर - क्लीन अँड ग्रीन कॅम्पस, डॉ. धवल शहा, NSS समन्वयक - इंजिनिअरिंग, प्रा. झियाऊल हक, NSS समन्वयक - फार्मसी, तसेच लेक्चरर ॲनी मॅथ्यू, NSS समन्वयक - डी फार्मसी हे मान्यवर उपस्थित होते. सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व NSS स्वयंसेवकांनी एकत्र येऊन परिसरात विविध प्रकारचे वृक्ष लावले. या उपक्रमाद्वारे पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला गेला.

हा वृक्षारोपण उपक्रम पद्मश्री डॉ. जाहिर आय. काझी, अध्यक्ष - अंजुमन-इ-इस्लाम आणि मा. कार्यकारी अध्यक्ष - BINM बुरहान हारिस यांच्या सातत्यपूर्ण प्रेरणा व मार्गदर्शनाचा एक महत्त्वपूर्ण भाग ठरला. AIKTC नेहमीच पर्यावरण संवर्धनासाठी विविध उपक्रम तसेच शासनाच्या विविध योजनांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत आला आहे.

## संपादकीय

# आता लक्ष तपासाकडे

बोइंगची विमाने जगभरात अनेक देशांमध्ये वापरली जात असल्यामुळे जगभराचे लक्ष अहमदाबाद विमान दुर्घटनेच्या तपासाकडे लागले आहे. अकस्मात उद्भवलेल्या एखाद्या तांत्रिक समस्येमुळे हा अपघात झाला की बोइंगच्या विमानांमधील एखादा दोष यास कारणीभूत ठरला या प्रश्नाचे उत्तर सगळ्यांनाच हवे आहे. विमानातील अखेरच्या क्षणांच्या साऱ्या नोंदी ठेवणारा 'ब्लॅकबॉक्स' तपासअधिकाऱ्यांच्या हाती लागला असून लवकरच या दुर्दैवी विमान अपघातामागील कारणे उजेडात येतील अशी अपेक्षा आहे.

**एअर इंडियाचे अहमदाबादहून लंडनला निघालेले बोइंग ७८७ ड्रीमलाइनर विमान उड्डाणानंतर काही सेकंदातच कोसळून झालेल्या दुर्घटनेची भीषणता गुरुवारी सगळ्यांना हादरवून गेली तर या अपघातात प्राण गमावलेल्या अनेकांसंदर्भातील तपशील शुक्रवारी समोर आल्याने त्या दुर्दैवी जिवांसाठीची हळहळ आणखी गडद झाली. उड्डाणानंतर फारशी उंचीच गाठू न शकलेले हे विमान विमानतळानजीकच्या बीजे मेडिकल कॉलेजच्या होस्टेलवर कोसळल्याने तेथील काही विद्यार्थीही मृत्यूमुखी पडले आहेत. तर दुर्घटनेनंतर उठलेल्या आगीच्या लोळातून, घुसमटवून टाकणाऱ्या धुरातून वाट काढत कसेबसे बाहेर पडलेले काही जखमी विद्यार्थी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत. या दुहेरी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांची अवस्था अतिशय बिकट आहे. विमान कोसळल्यानंतर झालेल्या स्फोटाची तीव्रता विमानातील इंधनाच्या प्रचंड साठ्यामुळे भयावह होती. त्यामुळे अनेक दुर्दैवी प्रवासी बसल्या जागीच जळून खाक झाले. घटनास्थळी मृतदेहांचे जळालेल्या अवस्थेतील अवशेष हाती लागल्याने त्यांची ओळख पटवण्याचे मोठे आव्हान आता आहे. सरकारी यंत्रणेने तातडीने डीएनए चाचण्यांची व्यवस्था केल्यामुळे शुक्रवारच्या दिवसभरात २१९ कुटुंबिय व नातेवाईकांनी आपले नमुने तपासणीसाठी जमा केले. अद्याप अनेक विदेशी प्रवाशांचे कुटुंबिय व नातेवाईक अहमदाबादमध्ये पोहोचायचे असल्याने या संपूर्ण प्रक्रियेला बराच वेळ लागणार आहे. या प्रतिक्षेमुळे कुटुंबियांचा दु:खावेग अधिकच तीव्र होताना दिसून आला आणि ते स्वाभाविकच आहे. आनंदाने निरोप घेऊन लंडनमधील दिवसांविषयी मनात स्वप्ने व आशा बाळगून निघालेल्या आपल्या आप्तस्वकियांचा असा करुण अंत पाहून झालेली अनेकांच्या कुटुंबियांची अवस्था शब्दांत वर्णन करण्याच्या पलीकडची आहे. यात मुलाबाळांसह परदेशात नवे आयुष्य सुरू करण्यासाठी निघालेले दाम्पत्य आहे, तसेच प्रथमच परदेशातील पतीला भेटण्यासाठी जाणारी नवपरिणिताही आहे. नात्यातील कुणाच्या पंच्याहत्तरीसाठी लंडनला निघालेले वयोवृद्ध जोडपे आहे, तसेच मोठ्या परिश्रमांनी आपल्या स्वप्नातील कारकीर्दीला सुरुवात करणाऱ्या एअर इंडियाच्या तरुण हवाई कर्मचारीही आहेत. यातील प्रत्येक शोकांतिका सगळ्यांनाच सुन्न आणि नि:शब्द करणारी आहे. एकीकडे हे दु:ख आहे तर दुसरीकडे हा भीषण अपघात झालाच कसा हा प्रश्न आहे. हवाई उड्डाण क्षेत्राशी संबंधित तज्ज्ञांकडून गुरुवारपासून तांत्रिक बिघाडांमागील कारणांच्या काही शक्यता व्यक्त करण्यात आल्या असल्या तरी शुक्रवारी मात्र टीकेचा रोख बोइंग विमानांच्या सुरक्षिततेकडेही वळला. अहमदाबादमधील अपघातग्रस्त बोइंग ७८७–८ ड्रीमलाइनर प्रकारचे विमान कोसळण्याची ही जगभरातील पहिलीच घटना असली तरी बोइंगच्या अन्य प्रकारच्या विमानांचे आतापर्यंत ६ हजार अपघात झाल्याचे सांगितले जाते. बोइंग ७८७ मध्येही बिघाड होण्याच्या अनेक घटना नोंदल्या गेलेल्या आहेत. बोइंग विमानांविषयी अमेरिकेचे सरकार व संसदेनेही चौकशी केली आहे. परंतु तरीही ७८७ हे विमान मात्र आजवर सुरक्षित गणले जात होते. अहमदाबादमधील दुर्घटनेनंतर आता आपल्या केंद्र सरकारनेही बोइंग विमानांच्या सुरक्षा तपासणीचे आदेश दिले आहेत.**

# १४ जून जागतिक रक्तदाता दिन




रक्त देऊ या..आशा जागवू या.
एकत्रितपणे जीव वाचवू या...।

मानवी रक्ताची गरज कधीही न संपणारी असल्यामुळे रक्तदानाची प्रेरणा समाजात द्दढ करणे, निरोगी रक्तदात्यांची फौज तयार करून रक्तदात्यांमध्ये स्वैच्छिक रक्तदानाविषयी जनजागृती करणे, सामाजिक बांधिलकी जोपासून रक्तदात्यांविषयी कृतज्ञता निर्माण व्हावी... जागतिक रक्तदाता दिनाच्या निमित्ताने एवढाच उद्देश..

रक्तदाता हा रुग्णांचा जीव वाचविणारा महत्त्वाचा दुवा आहे. अनेक वर्षांपासून ज्या रक्तदात्यांनी सामाजिक बांधिलकी ठेवून आयोजित रक्तदान शिबिरात, रक्तकेंद्रात स्वयंस्फूर्तीने जवळच्या शासन मान्यता प्राप्त रक्तकेंद्रात गरजू रुग्णांसाठी रक्तदान (२५,५०,१०० किंवा त्यापेक्षा जास्त वेळा )केलेल्या रक्तदात्यांप्रति आभार व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे १४ जून जागतिक रक्तदाता दिन.

मानवाचे प्राण वाचवण्यासाठी ज्या रक्तदात्यांनी आपले स्वैच्छिक रक्तदान करुन रक्तदात्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस.....म्हणजे १४ जून जागतिक रक्तदाता दिवस..

ए,बी,ओ 'रक्तगटाचा जनक ' कार्ल लँडस्टेनर यांच्या जयंतीदिनी १४ जून हा 'जागतिक रक्तदाता दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. सहानुभूती व सामाजिक बांधिलकी व स्वेच्छेने रक्तदान करणारे रक्तदाते यांना प्रोत्साहित करण्यासाठी हा 'जागतिक रक्तदाता दिवस' साजरा करण्यात येतो.

या वर्षाचे शासनाचे घोष वाक्य आहे,
रक्त देऊ या..आशा जागवू या.
: एकत्रितपणे जीव वाचवू या...।

आधुनिक तंत्रज्ञान प्रत्येक क्षेत्रात प्रगत झाले असले तरी पण अजूनही मानवी रक्ताला कुठलाही पर्याय आजपावेतो मानवाला अथवा शास्त्रज्ञांना सापडला नाही. यासाठी माणसाचे प्राण वाचवण्यासाठी मानसाचेच रक्त लागते. हे आजही जगजाहीर आहे.

कुणाला कधी आणि कोणत्यावेळी रक्ताची गरज भासू शकते हे कोणीही सांगू शकत नाही.

रक्त हे प्रत्येक मानवाच्या शरीरात तयार होत असते. रक्तदान ही जीव वाचविण्याची प्रक्रिया आहे आणि जीव वाचवणे नक्कीच सामान्य गोष्ट नाही! ही बाब नागरिकांच्या लक्षात आणून देऊन स्वैच्छिक रक्तदान मोहीम राबविणे महत्त्वाचे ठरते.

आपल्या शरीराला जिवंत ठेवणाऱ्या
घटकांपैकी सर्वात महत्त्वाचा
घटक म्हणजे रक्त...!

रक्त हे शरीराचा अविभाज्य घटक असुन संपूर्ण मासपेशींना तसेच अवयवांना पोषक व प्राणवायू(ऑक्सिजन)देण्याचे कार्य रक्त करत असते.

स्वैच्छिक रक्तदान...वाचवी रुग्णांचे प्राण... विषयी जनजागृती:

१)रक्त हे फार काळ टिकवून अथवा साठवता येत नसल्यामुळे सतत रक्तदानाद्वारे रक्ताची गरज पूर्ण होते.

२)रक्तदान थँलेसेमिया, हिमोफिलिया ,ल्युकेमिया इ. रुग्णांसाठी लाईफ लाईन आहे .अशा रुग्णांना नेहमी रक्ताची गरज भासते. अशा रुग्णांना कधीही रक्ताची कमतरता भासू नये म्हणून स्वैच्छिक रक्तदान महत्त्वाचे.....!

३)अतिदक्षता,प्रसुती,अपघात, रक्तक्षय,अतिरक्तस्त्राव इ.आदी अशा रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी तातडीने रक्ताची आवश्यकता भासते.अशा रुग्णांसाठी स्वैच्छिक रक्तदान महत्त्वाचे....!

४)आपल्या रक्तदान केलेल्या एका युनिट मधून रक्त व रक्तघटक वेगळे केले जातात.(तांबड्या पेशी, पांढऱ्या पेशी(प्लाझमा),रक्तबिंबीका (प्लेटलेट्स)इ.अशाप्रकारे आपल्या रक्तदानाने एक ते तीन रुग्णांचे प्राण आपण वाचवू शकता.

५) माझ्या रक्तदानाने निश्चितच गरजूंना रक्त पुरवठा झाल्याचे समाधान मिळणार..यासाठी स्वैच्छिक रक्तदान महत्त्वाचे.!

६) रक्तदानाने.... शरीरातील रक्तदाब,कोलेस्टेरॉलचे प्रमाण योग्य नियंत्रण राहते.

७) समाजाचे ऋण फेडायची ही एक संधी रक्तदानामुळे मिळते..

८) नवीन रक्त तयार करण्याची क्षमता वाढते.

९)रक्तदान केल्यानंतर चोवीस तास ते सात दिवसात नैसर्गिकरित्या झिज भरून निघते.

१०)रक्तदान केल्यानंतर नवीन पेशी तयार होण्यासाठी नवचेतना निर्माण होते.

११)शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार रक्तदान प्रक्रियेत रक्तदानावेळी सुरक्षिततचे काटेकोरपणे पालन केले जाते.

१२)समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून निःस्वार्थीपणे,

समाजहितासाठी, राष्ट्रसेवा म्हणून रक्तदान महत्त्वाचे आहे.

१३)निरोगी व्यक्ती दर तीन महिन्यांनी रक्तदान करु शकता.

यासाठी शासनस्तरावरुन समाजात स्वैच्छिक रक्तदानाबाबत सामाजिक कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी विविध उपक्रम, अभियान, जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येतात. सोबतच स्वैच्छिक रक्तदान विषयी नागरीकांमध्ये सामाजिक बांधिलकी, समाजहित, राष्ट्रीयतेची भावना, युवा शक्तीमध्ये रक्तदानाविषयी गैरसमज दूर करून स्वैच्छिक रक्तदानाविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे, सुदृढ मानसिक आरोग्य, स्वैच्छिक रक्तदानाबाबत समाजात सकारात्मक बदल घडवून आणणे हे अत्यंत महत्वाचे आहे.

यासाठी केंद्र सरकार अंतर्गत राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र शासनातर्फे आरोग्य विभाग,महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सो.,राज्य रक्त संक्रमण परिषद, धर्मदाय, सांस्कृतिक/ सामाजिक सेवाभावी संस्था , विविध संघटना इ.मार्फत शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार स्वैच्छिक रक्तदान शिबिरे तसेच जनजागृती पर कार्यक्रम आयोजित केले जातात. भारताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्वैच्छिक रक्तदानाचे प्रमाण कमी आहे. पण शासन स्तरावर जनजागृती मोहीम वेळोवेळी राबविण्यात येते.

आपल्या रक्तदानामुळे, आपण अनेक लोकांचे जीवन वाचवू शकतो. स्वैच्छिक रक्तदान हे सामाजिक कार्याबरोबर कर्तव्य देखील आहे. जे आपल्याला आपल्या समाजात जोपासण्याची गरज आहे.

रक्तदाता हा रुग्णांसाठी नेहमी आशेचा किरण ठरला आहे. रक्त हे कृत्रिमरीत्या तयार करता येत नाही तर ते तयार होते तुमच्या आमच्या मानवी शरीरात.यासाठी रक्तदाता म्हणून आपण स्वतःहून स्वैच्छिक रक्तदान करणे महत्त्वाचे ठरते. यासाठी शासनाच्या घोष वाक्यानूसार

करुया स्वैच्छिक रक्तदान... गरजूं रुग्णांचे
प्राण वाचवण्यासाठी ...
आशा जागवू... या...!

यासाठी सामाजिक बांधिलकी ठेऊन एकत्रितपणे स्वैच्छिक रक्तदान मोहीम राबवून.... रुग्णांचे प्राण वाचवू या..!

या लेखाव्दारे समाजात तसेच युवाशक्तीमध्ये रक्तदानाविषयी जनजागृती व्हावी यामागे एवढाच उद्देश.


**– हेमकांत सोनार,**
रक्तपेढी तंत्रज्ञ,रक्त केंद्र,
अलिबाग–रायगड.



## बदलते तंत्रज्ञान

# ऑनलाईन घोटाळ्याचा नवा प्रकार डिजिटल अरेस्ट

आजच्या २१ व्या युगात ऑनलाइन घोटाळ्यांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. डिजिटल अरेस्ट हा आता एक नवीन प्रकार उदयाला आला आहे.डिजिटल अरेस्ट म्हणजे डिजिटल स्वरुपात अटक.



मात्र डिजिटल अरेस्ट नावाचा कोणताही प्रकार अस्तित्वात नाही डिजिटल अरेस्ट म्हणजे एखादी व्यक्ती आपण पोलीस किंवा तपास यंत्रणांशी संबंधित असल्याचं सांगून फोन करते. तुम्हाला डिजिटल अरेस्ट झाली आहे असे सांगतात. तुम्हाला ड्रग्स किंवा मनी लॉंड्रिंगच्या प्रकरणात डिजिटल अरेस्ट करत असल्याचं सांगितलं जातं. या गुन्ह्यातून सुटका हवी असेल तर पैशाची मागणी केली जाते. बऱ्याच वेळेला व्हिडीओ कॉल करुन पोलीस स्टेशन असल्यासारखं भासवण्यात येतं. तुम्हाला पैसे पाठवण्यासाठी दबाव टाकला जातो आणि तुमची फसवणूक केली जाते.

सायबर भामटे तुमची सगळी माहिती काढतात. तुम्ही कुठे फिरायला गेला होतात, तुमची मुलगी कोणत्या शाळेत शिकतेयाबद्दल तुम्हाला ते माहिती सांगतात त्यामुळे तुम्हाला खरंच वाटायला लागतं की हे तपास अधिकारी आहेत.

सायबर भामटे आपण सीबीआय, पोलीस स्टेशन किंवा नार्कोटिक्समधून बोलतोय, असं सांगून व्हिडीओ कॉल करतात. व्हिडीओ कॉल करण्याआधी पोलीस स्टेशनसारखा किंवा सरकारी ऑफिससारखा सेटअप केला जातो.

सायबर भामटे तुमच्यावर वेळेचा दबाव आणतात. या गुन्ह्यातून बाहेर यायचं असेल तर पैशांची मागणी करतात.

पोलीस, सीबीआय, नार्कोटिक्स किंवा आणखी कुठलीही तपास यंत्रणा कधीही फोन करून, व्हिडीओ कॉल करून चौकशी करत नाही कुठलीही सरकारी यंत्रणा किंवा सरकारी कार्यालय फोन किंवा व्हिडीओ कॉल करुन तुम्हाला कुठलेही प्रश्न विचारत नाही. कुठल्याही तपास यंत्रणा किंवा सरकारी यंत्रणा कधीही फोन करून तुमच्याकडे पैशांची मागणी करत नाहीत. त्यामुळे असा फोन आलाच तर अजिबात घाबरुन जाऊ नका आणि घाईघाईनं कुठलाही निर्णय घेऊ नका. शक्य असल्यास त्या व्हिडीओ कॉलचा स्क्रीन शॉट घ्या किंवा रेकॉर्ड करा. त्यानंतर स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करा.तुम्ही मेहनतीनं कमावलेला पैसा कुठल्याही परिस्थितीत सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकून त्यांना देऊ नका.

# नाटककार गोविंद बल्लाळ देवल

सांगलीचा नाट्यानुकूल परिसर, वडील बंधू संगीशास्त्रज्ञ, दुसरे बंधू हे कुशल नट आणि किर्लोस्करांसारखे मुरब्बी नाट्यगुरू असे गोविंद बल्लाळ देवल यांच्या भोवतालचे वातावरण नाट्याला पोषक होते. साहजिकच अल्पकाळ शिक्षकाचा व्यवसाय केल्यावर देवलांनी हयातभर नाट्यसेवेला वाहून घेतले.

गोविंद बल्लाळ देवल हे प्रसिद्ध नाटककार आणि नाट्यदिग्दर्शक. त्यांचा जन्म १३ नोव्हेंबर १८५५ रोजी सांगली संस्थानातील हरिपूर या ठिकाणी झाला. वडील बल्लाळ उर्फ बाळाजीपंत हे अल्प वेतनावर संस्थानी नोकर होते. देवलांचे ज्येष्ठ बंधू कृष्णाजीपंत ह्यांचा संगीतशास्त्राचा मोठा व्यासंग होता. मधले बंधू रामभाऊ हे त्याकाळी प्रसिद्ध असलेल्या इचलकरंजीकर नाटक मंडळीतील एक उत्तम नट होते. देवलांचे मराठी शिक्षण प्राथमिक शाळेत आणि संस्कृतचे अध्ययन खासगीरित्या हरिपूरला झाले. वडीलबंधूंना नोकरी लागल्यावर कोल्हापूर व बेळगाव येथे माध्यमिक शिक्षण होऊन १८७८ मध्ये ते मॅट्रिक झाले. बेळगावच्या रहिवासात सुप्रसिद्ध नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्याशी त्यांचा दाट परिचय झाला. पुढे पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजातील शेतकी शिक्षणवर्गाचा अभ्यासक्रम पूर्ण करून देवलांनी १८८० मध्ये प्रमाणपत्र मिळविले. सांगलीचा नाट्यानुकूल




## निमित्त

परिसर, वडील बंधू संगीशास्त्रज्ञ, दुसरे बंधू हे कुशल नट आणि किर्लोस्करांसारखे मुरब्बी नाट्यगुरू असे त्यांच्या भोवतालचे वातावरण नाट्याला पोषक होते. साहजिकच अल्पकाळ शिक्षकाचा व्यवसाय केल्यावर देवलांनी हयातभर नाट्यसेवेला वाहून घेतले.

पुण्यात असताना देवल आणि शंकरराव पाटकर यांनी आर्योद्धारक नावाची नाटक मंडळी नाट्यकलेला नवे वळण लावण्याच्या हेतूने स्थापन केली. या मंडळीत असताना परशुरामपंततात्या गोडबोल्यांनी मराठीत अनुवादिलेल्या वेणीसंहार नाटकातील अश्वत्थामा आणि महादेवशास्त्री कोल्हटकरांच्या अथेल्लोमधील अजितसिंग या त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. १८८० साली किर्लोस्कर नाटक मंडळी स्थापन झाली. किर्लोस्कर पद्धतीची नाट्यपदे रचण्यात देवल कुशल होते. किर्लोस्करांच्या शाकुंतलातील शकुंतलेची पदे देवलांनी रचली आणि त्या मंडळीचे ते आधारस्तंभच बनले. देवलांनी इंग्रजीवरून तीन, संस्कृतवरून तीन व एक स्वतंत्र अशी एकूण सात नाटके रचली. टॉमस सदर्नकृत द फेट्ल मॅरेजवरून गॅरिकने तयार केलेल्या इझाबेला या रंगावृत्तीच्या आधारे दुर्गा (१८८६), शेक्सपिअरकृत ऑथेल्लोची रंगावृत्ती झुंझारराव (१८९०) फाल्गुनरावचे गंधर्व नाटक मंडळीसाठी केलेले संगीत रूपांतर संशयकल्लोळ (१९१६) हे कमालीचे लोकप्रिय ठरले. मृच्छकटिक (१८८९), विक्रमोर्वशीय (१८८९) व बाणाच्या कादंबरीवर आधारलेले शापसंभ्रम (दुसरी आवृ. १९००) ही त्यांची संस्कृताधारे रचलेली नाटके. त्यांच्या दुर्गा नाटकाला राजाराम कॉलेजचे, तर शापसंभ्रमला इंदूरच्या महाराजांचे पारितोषिक मिळाले होते. पण या दोन्ही नाटकांपेक्षा त्यांच्या मृच्छकटिक, झुंझारराव आणि संशयकल्लोळ यांना प्रायोगिक यश विशेष लाभले. तथापि यांहीपेक्षा त्यांचे सं. शारदा (१८९९) हे नाटक साहित्यिक आणि प्रायोगिक या दोन्ही दृष्टींनी अद्वितीय ठरले. देवलांनी जी रंगभूमीची सेवा केली, ती चिरंतन स्वरूपाची आहे. अशा या थोर नाटककाराचे १४ जून १९१६ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# पावसाळ्यात हेल्दी राहण्यासाठी जाणून घ्या, या टिप्स...

पावसाळा सर्वांना हवाहवासा वाटतो. कारण फेब्रुवारी पासून झालेल्या उन्हाळ्याने प्रत्येकजण हैराण झालेला असतो. पावसाळयातील थंडावा हवाहवासा वाटला तरी या हा ऋतू म्हणजे अनेक आजारांना घेऊनच येत असतो. जसे की, डेंगू, मलेरीया, कॉलरा, अतिसार असे बरेचसे आजार.



त्यामुळे पावसाळयात आरोग्याकडे दुर्लक्ष न करता स्वतःची काळजी घेणे आवश्यक असते. तुम्ही सुद्धा पावसाळ्यात स्वतःची काळजी कशी घ्यायची, स्वतःला हेल्थी कसे ठेवायचे या विचारात असाल तर ही बातमी तुमच्यासाठी.

पाणी उकळवूनच प्यावे –. कारण पावसाळयातील बरेचसे आजार हे दूषित पाण्यामुळे आणि अन्नामुळे होत असतात. पाणी उकळल्यावर त्यातील बॅक्टरीया नष्ट होतात. त्यामुळे पावसाळयात हेल्थी राहण्यासाठी सर्वप्रथम पाणी उकळवून पिण्याची सवय लावा. याशिवाय रोज सकाळी कोमट पाण्यात लिंबू टाकून प्यायल्याने शरीरातून हानिकारक व्हायरस बाहेर पडतात.

हंगामी फळे खावीत – पावसाळ्यात हंगामी फळे अवश्य खावीत. तुम्ही या दिवसात बेरी, पपई, प्लम, सफरचंद, डाळिंब नासपती अशी फळे खायला हवीत. या फळामध्ये असे गुणधर्म असतात जे शरीराला इन्फेक्शन, ऍलर्जी आणि वायरल इन्फेक्शनपासून दूर ठेवतात.

बाहेरचे पदार्थ खाणे टाळा – बाहेरचे पदार्थ अर्थात स्ट्रीट फूड खाण्याला सर्वांचीच पसंती असते. पण, पावसाळ्यात स्ट्रीट फूड खाणे टाळावे. स्ट्रीट फूड बनवताना स्वछ्तेची काळजी घेतली जात नाही. असे पदार्थ खाऊन तुम्हाला इन्फेक्शन होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे पावसाळ्यात तळलेले आणि प्रिझर्व्ह केलेले पदार्थ खाणे टाळावे. असे पदार्थ खाल्यास पोटाच्या तक्रारी उद्भवू शकतात.

भरपूर झोप घ्यावी – पावसाळयात जर तुम्हाला हेल्थी राहायचं असेल तर भरपूर झोप घ्यावी. किमान ७ ते ८ तासांची झोप घ्यावी. झोप पूर्ण झाल्यावर शरीर निरोगी राहते, ज्यामुळे तुम्हाला वायरल इन्फेक्शन होण्याचा धोका कमी असतो.

कच्चे पदार्थ खाणे टाळा – पावसाळ्यात कच्चे पदार्थ खाणे टाळावे कारण या ऋतूमध्ये मेटॅबॉलिझम क्रिया ही हळुवार कार्य करत असते. ज्यामुळे अन्नपदार्थ पचायला वेळ लागतो.

या टिप्स तुम्ही जर फॉलो केल्यात तर पावसाळ्यात तुम्ही नक्कीच हेल्दी राहू शकता.

# पेणमध्ये महावितरणाचा भोंगळ कारभार; लघु उद्योगांना बसतोय फटका

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहर आणि ग्रामीण भागात विजेचा लपंडाव सुरूच असल्याने पेण परिसरातील नागरिक कमालीचे हैराण झाले असून, तीव्र नाराजी व्यक्त करीत आहेत. त्याच प्रमाणे देखभाल दुरुस्तीसाठी वीजपुरवठा बंद करूनही वारंवार वीजपुरवठा खंडीत होत असल्याने नागरिकांचा जीव मेटाकुटीला आला आहे.

पेण ग्रामीण विभागात तर वारंवार विजेचा खेळखंडोबा पाहायला मिळतं आहे. विद्युत



पुरवठा खंडित का झाला ?याचे उत्तर महावितरणच्या अधिकारी यांच्याकडून नागरिकांना मिळत नाहीत. महावितरणचे कर्मचारी एक तर फोन बंद करून बसतात किंवा संपर्क झाला तरी फोन उचलायची तसदी घेत नाहीत, अशी तक्रार नागरिक करीत आहेत. तर काही वेळा महावितरणचे अधिकारी वारंवार खंडित होणाऱ्या विद्युत पुरवठ्याचे खापर निसर्गावर फोडत असतात.

पेण शहर व परिसरात विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रकार दररोजचे आहेत. गेल्या चार दिवसांपासून पेण ग्रामीण भागातील कासमाळ, विराणी, रानसई, शेणे आदी वाड्यांवर दिवसाचे ३ ते ४ तास विद्युत पुरवठा खंडित असतो.

पेण तालुक्यातील विविध भागात वीजप्रवाह खंडित करण्याचे प्रकार महावितरणकडून वारंवार होत आहेत. आठवड्यातुन मंगळवारी किंवा कधी कधी शुक्रवारी दिवसभर देखभाल दुरुस्तीसाठी वीजपुरवठा खंडित केला जात असतांना, इतर दिवशींही दिवस रात्र, सकाळ संध्याकाळ कधीही वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिकातून महावितरणच्या व्यवस्थापनाबाबत संतप्त प्रतिक्रिया येत असून चौकशीची मागणी नागरिक करीत आहे.

पेण तालुक्यात मोठ्या प्रमाणात गणेशमूर्ती बनविण्याचे कारखाने आहेत. तसेच अनेक लहान मोठे उद्योग धंदे ही आहेत. महावितरणाच्या आनागोंदी कारभारामुळे तसेच महावितरणाच्या निष्क्रियतेचा फटका या लहान मोठ्या उद्योगांना बसत आहे.

पेण पूर्व विभागात विविध कंपन्या आहेत. नागरिकांची गावाखेड्यातील वीज खंडित झाली, तरी या कंपन्यांची वीज मात्र जशीच्या तशी असते. सर्वसामान्य नागरिकांची आबाळ करून विजेचा लोड, मोठ्या खाजगी कंपन्यांना देण्यात येत असल्याचा आरोप होत आहे.

# म्हसळा तालुक्यात पाणीपुरवठा योजनेचे २३० पाईप चोरीला

**म्हसळा :** येथील शहरातील पाणीपुरवठा योजनेसाठी आणलेले २३० पाईप चोरीला गेल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या जलवाहिन्यांची किंमत २५ लाख आहे. याप्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

म्हसळा शहरात ४२ कोटी रुपयांच्या पाणी योजनेचे काम सुरु आहे.त्यामुळे मागील काही महिन्यांपासून पाणी योजनेचे काम सुरु आहे. यासाठी लागणारी सर्व यंत्रणा संबंधित ठेकेदाराने म्हसळा बायपासनजीक ठेवली होती. गुरुवारी रात्री सुमारे २५ लाख रुपये किमतीचे २३० पाईप अचानक चोरीला गेल्याचे निदर्शनास आले.

याप्रकरणी संबंधित ठेकेदाराने म्हसळा पोलीस ठाण्यात धाव घेतली असून तक्रार केली आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक संदीप कहाळे यांचा मार्गदर्शनाखाली तपास सुरु आहे. दरम्यान, म्हसळा शहरातील पाणी योजनेचे पाईप चोरी झाल्यानंतर, एवढच बिघायच राहिल होत, अशी चर्चा यानंतर म्हसळ्यामध्ये सुरु झाली आहे.

# वटपौर्णिमेच्या निमित्ताने 'अंनिस'चा वृक्षारोपण उपक्रम

**पेण : प्रतिनिधी**

वटपौर्णिमेचे औचित्य साधून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पेण शाखेच्या वतीने पेण मधील रिंग रोडच्या बाजूला वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आपण आपल्या जोडीदारच आयुष्य वाढविण्याबरोबरच पृथ्वीतलावरील सर्वच सजीवांच आयुष्य वाढविणे आणि पृथ्वीचे वातावरण संतुलित ठेवणे हाच या कार्यक्रमाचा उद्देश्य होता.

यावेळी उपस्थित महिलांकडून प्रश्नावली असणारा फॉर्म भरून घेण्यात आला. आजची महिला आजचा दिवस कोणत्या दृष्टीकोनातून पहाते याबाबत माहिती घेण्यात आली. वृक्षारोपणाची सुरवात डॉ . सुजाता निकम मॅडम यांच्या हस्ते करण्यात आली त्यानंतर प्रत्येक कुटुंबाच्या हस्ते एक एक रोप लावण्यात आली, जे रोपं ज्या कुटुंबाने लावली तो रोपं त्या कुटुंबाने दत्तक घेऊन वाढविण्याची शपथ घेतली. सदर उपक्रमास लागणारी सर्व रोपं खासदार धैर्यशिल पाटील यांनी उपलब्ध करून दिली .



# दमदार पावसाची शेतकऱ्यांना प्रतीक्षा



**खोपोली : प्रतिनिधी**

मान्सून प्रत्यक्षात सुरू झाल्यापासून खोपोली व परिसरात अद्याप मुसळधार पाऊस झालेला नाही. मागील महिन्यात कोसळलेला बे मौसमी पावसाने शेतीची पूर्व मशागत व डोंगर रान हिरवी झाली आहेत, मात्र भात पेरणीसाठी आवश्यक मान्सूनी पाऊस अद्याप पडलेला नाही. दररोज निर्माण होत असलेले पावसाळी वातावरणाच्या भरवश्यावर अनेक शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी ची कामे उरकली असून भाताची पेरणी होण्यासाठी दमदार पाऊसाची प्रतीक्षा शेतकऱ्यांना आहे.

शेतकऱ्यांनी पेरणीसाठीच्या मशागत कामांना जोमाने सुरुवात केली आहे, मात्र जुन महिन्यात अद्याप ही पाऊसाची दडी कायम आहे. येत्या दोन तीन दिवसांत मुसळधार पाऊस येईल अशी आशा शेतकऱ्यांना असून तो आभाळाकडे डोळे लावून आहे. दरम्यान, शेतीतज्ञ व हवामान खात्याने पेरणी करण्याची घाई करू नका असा सल्ला शेतकऱ्यांना दिला आहे. यावर्षी मे महिन्यात मोठ्या प्रमाणात मान्सूनपूर्व पाऊस कोसळला असल्याने, शेतीच्या कामांना वेळेपूर्वी सुरुवात झाली. शेतकऱ्यांनी शेतीची मशागत पूर्णत्वास आणली आहे. भात पेरणीची तयारी झाली असून, दमदार पाऊसाची प्रतिक्षा मात्र आहे.

दोन तीन दिवसांत मान्सून सक्रिय होईल व संपूर्ण रायगडसह राज्यात दमदार पाऊस पडेल असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे पेरणीची घाई न करता योग्य पाऊस पडल्यावर व मान्सून नियमितपणे सक्रिय झाल्यावरच करण्याचा सल्ला तज्ञांनी दिला आहे.

# शालेय विद्यार्थ्यांसाठी मास्टरशेफ स्पर्धा

**मुरुड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे नुकतेच शालेय विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी मास्टरशेफ स्पर्धा उत्साही वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये पाककलेची आवड निर्माण करणे, त्यांची सर्जनशीलता, आत्मविश्वास व स्वावलंबन यांना प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या अनोख्या स्पर्धेत इयत्ता १ली व २री मधील विद्यार्थ्यांनी न फोडणी/शिजवण नसलेले अन्न या संकल्पनेवर आधारित विविध पदार्थ सादर केले. यामध्ये स्प्राऊट्स भेळ, चाट, फ्रूट सॅलड, सँडविच, आलू चाट, अंजीर रोल्स यांसारख्या कल्पक, आकर्षक आणि पौष्टिक रेसिपीजचा समावेश होता.

विद्यार्थ्यांनी स्वतःची भांडी, साहित्य, मास्टरशेफ टोप आणि एप्रन घेऊन, रेसिपी सादर करताना सजावट, रंगसंगती, पोषणमूल्य व सौंदर्य यांचे सुंदर दर्शन घडवले. प्रत्येक रेसिपीसोबत माहितीपुस्तिकाही सादर करण्यात आली. या उपक्रमाचे खास आकर्षण ठरले 'फोटो बूथ', जिथे विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी मास्टरशेफ लूकमध्ये सुंदर क्षण टिपले.

सर्व सहभागी विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत सांगितले, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य, आरोग्याची जाणीव व कलात्मकता यांचा सुरेख समन्वय साधला गेला आहे. अशा उपक्रमांतूनच खऱ्या अर्थाने आनंददायी शिक्षण साध्य होते.

या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व अंमलबजावणी शिक्षिका अश्विनी कांबळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली.




## ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली

**लोधिवली, ता.खालापूर, जि. रायगड**

**विकास कामे जाहिरात**

ग्रामपंचायत लोधिवली हद्दीतील ग्रामनिधी अंतर्गत गन २०२५-२६ या वर्गाच्या करिता खालील प्रमाणे विकासकामे करावयाची आहे. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. १४/०६/२०२५ ते दि.१९/०६/२०२५ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. १९/०६/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील किंवा ग्रामपंचायत ठरवेल त्या दिवशी उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत लोधिवली यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे/रोखीने स्वीकारण्यात येतील, कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्यांचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नाव व योजना नाव | निधी | अ. रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लोधिवली गाव अंतर्गत ७ गटारे साफ सफाई करणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | ३०००० | २०० | १% | ३ म. |
| २ | नढाळ गाव अंतर्गत ३ गटारे साफ सफाई करणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | ३५००० | २०० | १% | ३ म. |
| ३ | लोधिवली आ. वाडी अंतर्गत ३ गटारे साफ सफाई करणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | ३०००० | २०० | १% | ३ म. |
| ४ | वरोसे अंतर्गत ६ गटारे साफ सफाई करणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | ८०००० | २०० | १% | ३ म. |
| ५ | वरोसेवाडी अंतर्गत ६ गटारे साफ सफाई करणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | ८०००० | २०० | १% | ३ म. |
| ६ | वरोसे बौद्धवाडी अंतर्गत ३ गटारे साफ सफाई करणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | ३०००० | २०० | १% | ३ म. |
| ७ | बोरगाव बुद्रुक अंतर्गत ४ गटारे सफाई करणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | ३५००० | २०० | १% | ३ म. |
| ८ | वरोसे पिरकडवाडी अंतर्गत ४ गटारे साफ सफाई करणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | ३८००० | २०० | १% | ३ म. |
| ९ | नढाळ आ. वाडी अंतर्गत २ गटारे साफ सफाई करणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | २५००० | २०० | १% | ३ म. |
| १० | नढाळ ठाकूरवाडी रा.जि.प.शाळा दुरुस्ती करणे. | ग्रामनिधी सन २०२४-२५ | १५०००० | ५०० | १% | ६ म. |

**टीप:-**

१) निविदा भरणाऱ्या सर्व कंत्राटदारांनी दि. १४/०६/२०२५ ते दि. १९/०६/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय लोधिवली येथे सिलबंद लिफाफा जमा करणे बंधनकारक आहे.
२) निविदा भरताना आपले दर जी.एस.टी. वगळून भरणे बंधनकारक आहे. जी.एस.टी. चे दर संबंधित विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.
३) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४) मुदतीनंतर आलेल्या खाडाखोड करून साक्षांकित न केलेल्या व अटीशर्तीयुक्त निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
५) सदर कामांच्या निविदा अंदाजपत्रक निविदा व अटी शर्ती बाबत कार्यालयात निविदा धारकास माहितीपत्रक देण्यात येईल.
६) कोणत्याही नामंजूर निविदासंदर्भात निविदा धारकास कोणत्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.
७) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराला ५०० रु च्या बॉड पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
८) निविदे सोबत १% इसारा रक्कम रोखीने ग्रामपंचायत मध्ये सामान्य पावतीने भरणा करावी
९) काम सुरु करण्यापूर्वीचे फोटो, काम सुरु असतानाचे फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.
१०) ठेकेदार ग्रामपंचायतीचा येणे बाकीदार असल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

**सही/-**
**ग्रामपंचायत आधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली**



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **सचिन जयराम गावंड व ईतर** यांनी आमच्या अशिलाना समती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन मौजेः सारडे (५५३३४३)
(PU-ID : 11359901932), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १७९/२ खाते क्रमांक : ५१० | १ | ०.३८.०० पो.ख. ०.०२.०० **एकुण ०.४०.००** | ८.२५ |

**एकुण क्षेत्र ०.४०.०० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसांचे** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती नसल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : १४/०६/२०२५**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड -४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१



## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव कोणार्क रिव्हर सिटी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. कोप्रोली, ता. पनवेल, जि. रायगड., असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. १६/०६/२०२५ ते २०/०६/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. २१/०६/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि.२३/०६/२०२५ ते ०७/०७/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक १३/०७/२०२५ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सूचना व अधिक माहीती कोणार्क रिव्हर सिटी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. कोप्रोली,, ता. पनवेल, जि. रायगड या संस्थेचे कार्यालयांत पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(मकरंद दरवडे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**



## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड,**

**लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय, इआगरी समाज हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल ४१० २०६.**

Email: msbpanvel1993@gmail.com Emai: panvelcorporation@gmail.com

### जाहिर सूचना

पनवेल महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील इयत्ता ७ वी च्या एकूण २९३ विद्यार्थ्यांना एलिमेंटरी इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेसाठी चित्रकला किट उपलब्ध करुन द्यावयाची आहेत. याकामी इच्छुकांनी निविदा दर दि.२०.०६.२०२५ रोजी सायं. ३.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे सादर करावीत. सदर चित्रकला किटमध्ये खालीलप्रमाणे साहित्य आहे.

| अ.क्र. | साहित्य | तपशील | संख्या |
|---|---|---|---|
| १ | चित्रकला वही (नवनीत) | जंबो आकार | १ (१६ पृष्ठे) |
| २ | टीके पेपर (Branded) | A३ | १० |
| ३ | ट्रेसिंग पेपर (Branded) | A४ | ४ |
| ४ | पेन्सिल (HB) | HB | २ |
| ५ | पेन्सिल (HB) | ६B | २ |
| ६ | खोडरबर (Camel) | — | २ |
| ७ | शार्पनर (Camel) | — | २ |
| ८ | कंपास (Camel) | — | १ |
| ९ | कोनमापक (Camel) | — | १ |
| १० | स्केल (Camel) | १२ इंच | १ |
| ११ | स्केच पेन (Branded) | काळा रंग | २ |
| १२ | पोस्टर रंग (Camel) | १२ रंग | १ |
| १३ | प्लास्टिक क्रेयॉन (Camel) | २४ रंग | १ |
| १४ | रंगीत पेन्सिल (Camel) | १२ रंग | १ |
| १५ | वॉटर कलर केक (Camel) | १२ रंग | १ |
| १६ | रंग पॅलेट (Camel) | मध्यम आकार | १ |
| १७ | गोल ब्रश (Branded) | ६ क्र | १ |
| १८ | गोल ब्रश (Branded) | १ क्र | १ |
| १९ | गोल ब्रश (Branded) | १२ क्र | १ |
| २० | सपाट ब्रश (ईरपवशव) | ९ क्र | १ |
| २१ | कापूस चिंधी (Camel) | ८x८इंच | १ |
| २२ | क्लच पेन्सिल (Camel) | — | १ |
| २३ | ब्रश धुण्यासाठी कंटेनर (Branded) | लहान | २ |
| २४ | सुबोध चित्रकला पुस्तक (नवनीत) | — | १ |

**या कामी अटी व शर्ती खालीलप्रमाणे:-**

१. संस्था नोंदणी सर्टिफिकेट.
२. पॅनकार्ड (संस्थेचे नावाने अथवा मालकाचे नावाचे)
३. जाहिर निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीधारक यांना राहतील.
४. नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे कर व वाहतूक खर्चासह समाविष्ठ असावेत.
५. कार्यादेश दिल्यानंतर संबंधित संस्थेने सर्व कामे वेळेत व मुदतीत महानगरपालिका हद्दीतील नेमून दिलेल्या ठिकाणी करणे आवश्यक आहे.
६. कामाचा कालावधी ३० दिवसांचा असेल.
७. वरील प्रस्तावित कामांचे काम निहाय स्वतंत्र भावापत्रक/कोटेशन विहित वेळेवर सादर करावे.
८. प्राप्त भावपत्रके स्विकरण्याचे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना राहतील.

**सही/-**
**(गणेश शेटे)**
**अति. आयुक्त - I**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/**
**प्र.क्र. २५७/२५९/२०२५**
**दिनांक :- १३/०६/२०२५**

# नवी मुंबईत पाच महिन्यांमध्ये १२७ जणांचा अपघाती मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईमध्ये मागील वर्षी २८७ जणांचा अपघाती मृत्यू झाला. हे वर्ष सुरू झाल्यावर आतापर्यंत पाच महिन्यांत ३३१ अपघातांमध्ये १२७ जण मृत्यूमुखी पडले. अजूनही वर्ष सरण्यासाठी साडेसहा महिने शिल्लक असले तरी अपघातांची संख्या कमी होणे याकडे नवी मुंबईच्या वाहतूक पोलिसांना विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. नवी मुंबईतील अपघातांमध्ये उरण, न्हावाशेवा, पनवेल या ठिकाणी अपघातांमध्ये प्राण गमावल्यांची संख्या सर्वाधिक आहे.




नवी मुंबईतून पुणे, कोकणशी जोडलेल्या द्रुतगती आणि इतर राष्ट्रीय महामार्गांच्या जाळ्यासोबत विविध औद्योगिक वसाहती आणि जेएनपीए बंदरामुळे नवी मुंबईतील दळणवळणात झपाट्याने वाढ झाली आहे. ऑगस्ट महिन्यापासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळातून सुरू होणाऱ्या वाहतुकीमुळे शहरातील विविध राष्ट्रीय महामार्ग आणि शहरांतर्गत वाहतुकीवर ताण वाढणार आहे. शहरातील वाहतुकीवर नियंत्रण असावे यासाठी १६ वेगवेगळे वाहतूक पोलीस ठाणी निर्माण केली. वाहतूक ठाण्यांच्या कारभारावर लक्ष ठेवण्यासाठी या विभागाला स्वतंत्र पोलीस उपायुक्त नेमले आहेत. पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या नेतृत्वाखाली सरकारी रस्ते बांधणाऱ्या विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांसोबत वेळोवेळी बैठका घेतल्यामुळे नवी मुंबईतील ३० पैकी तीन अपघात प्रवण क्षेत्र (ब्लॅक स्पॉट) कायमची कमी झाल्याचा दावा उपायुक्त काकडे यांनी केला आहे.

सध्या उर्वरित २७ ब्लॅक स्पॉटवर तात्पुरते अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याचे काम सुरू असल्याचे उपायुक्त काकडे यांनी सांगितले. द्रुतगती महामार्गापासून ते पळस्पे आणि पळस्पे ते उरण, न्हावाशेवा या जेएनपीए महामार्गापर्यंत अपघाताचे मुख्य कारण रस्त्यावरील वाहने उभी केल्यामुळे अनेक अपघात झाल्याचे उघड झाल्यामुळे पोलिसांनी रस्त्याकडेला वाहने उभी करणाऱ्यावर सक्तीची कारवाई सुरू केली. या कारवाईतील सातत्यामुळे उरण परिसरात रस्त्याकडेला वाहने उभी करण्याचे प्रमाण कमी झाले आहे. पोलिसांनी दिशादर्शक व सूचना फलक लावण्यावर भर दिला आहे.

रात्री नऊ वाजल्यानंतर स्वतंत्र पेट्रोलिंगसाठी पथक नेमले आहे. रस्त्याकडेला बेकायदा उभ्या वाहनांमुळे वाहतुकीस अडथळा होत असल्याने हे फिरते पथक त्यावर कारवाई करते. ज्या उड्डाणपुलाच्या दुभाजकावर वाहने धडकत होती अशा ठिकाणी ब्लिंकर व रिफ्लेक्टर बसविण्यात आली आहेत. जेथे रस्त्यावर रात्रीची विजेची सोय नव्हती तेथे पथदिवे बसवले आहेत.

**पामबीचवरील अपघातांची संख्या झाली कमी!**

मद्यपी चालकांना रोखण्यासाठी दररोज वाहतूक नाकाबंदी लावल्यामुळे पामबीच मार्गावरील अपघाताचे प्रमाण कमी झाल्याची माहिती उपायुक्त काकडे यांनी दिली. पोलिसांच्या माध्यमातून एक हजाराहून अधिक लहान मोठे प्रबोधनाचे कार्यक्रम झाले.

**अपघात कमी करणे हेच आमच्या विभागाचे उदिष्ट आहे. रस्त्याकडेला उभ्या असलेल्या वाहनांमुळे अपघात होत असल्याचे समोर आल्याने उरण व परिसरातील रस्त्याकडेला एकही वाहन उभे केल्यास पोलिसांचे फिरते पथक सातत्याने कारवाई करत आहे. ब्लॅकस्पॉटवर दिर्घकालीन व तत्कालिन उपाययोजना केल्या आहेत. त्यावर देखरेख सुरु आहे.**
**-तिरुपती काकडे**, उपायुक्त, वाहतूक पोलीस विभाग

१६ पोलीस ठाण्यांमध्ये २० गस्त दुचाकीसह पोलीस नेमले आहेत. या दुचाकीवरील पोलिसांकडे अपघातावेळी जखमींना मदतीसाठी रोप, कटर असे साहित्य देण्यात आले आहे. महामार्गात बंद पडलेल्या वाहने रस्त्याबाजूला करण्याचे काम हेच पथक करतात.

# उरण तालुक्यात भात पेरणीला सुरुवात

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

यंदा पावसाला मे महिन्याच्या अखेरीस सुरुवात झाली. हा पाऊस पेरणी करण्यालायक होता, मात्र बेभरोवशाचा हा अवकाळी पाऊस असल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या नाहीत. खऱ्या अर्थाने मृग नक्षत्राचा पाऊस पडल्यानंतरच भात पेरणी केली जाते, मात्र यंदा पावसाला लवकरच सुरुवात झाल्यामुळे शेतकऱ्यांची मोठी तारांबळ उडाली.



दरम्यान, दोन दिवसांपूर्वी जिल्ह्यात अनेक ठिकाणी पेरणीला सुरुवात झाली असून सध्या पेरणीसाठी वातावरण पोषक आहे. मात्र काही ठिकाणच्या जमिनीत पाणी साचले असल्यामुळे त्या जमिनीतील भात पेरण्या खोळंबल्या आहेत. उरण तालुक्यात औद्योगिककरणाचे जाळे विणले असल्यामुळे, चिरनेर परिसरात अवघे ५० टक्के शेतकरी शेती करत असून, येथील शेतकऱ्यांनी स्वतःच्या अनुभवावर निसर्गावर भरोसा ठेवत पेरणीला सुरुवात केली आहे, परंतु या भागात मजुरांचा अभाव आहे.

जमीन नांगरणीसाठी लागणारे लाकडी बैलांचे नांगर नामशेष झाले आहेत. ज्या शेतकऱ्यांकडे पावर टिलर आहेत. अशा शेतकऱ्यांकडे पावर टिलर नांगरणीसाठी मिळावा यासाठी शेतकरी पावरटिलर मालकाकडे येरझऱ्या घालत आहेत. त्यामुळे या भागात पावर टिलरला मोठी मागणी वाढली असून, शेतकऱ्यांचे भवितव्य आता पावसावर अवलंबून असल्याची व्यथा शेतकरी सार्थक म्हात्रे यांनी व्यक्त केली.

# जितेंद्र म्हात्रेंना वकील पदवी प्राप्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असणारे राष्ट्रपती पोलीस पदक प्राप्त असणारे सहा.फौजदार जितेंद्र म्हात्रे हे न्यायशास्त्राची ५ वर्ष डिग्री कोर्स असलेली परिक्षा उत्तम मार्काने उत्तीर्ण झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनदंन करण्यात येत आहे.



सहा.फौजदार जितेंद्र म्हात्रे यांनी न्याय शास्त्राची ५ वर्षे डिग्री कोर्स असलेली बी.एल. एस.एल.एल.बी परिक्षा उत्तम मार्काने उत्तीर्ण होवून वकील पदवी प्राप्त केल्याने त्यांचे वपोनि गजानन घाडगे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# न्हावे येथे श्री समर्थ सद्गुरूनाथ दादामहाराज पुण्यतिथी सप्ताह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बाळकृष्ण महाराज, (नंदेश्वर), भाऊसाहेब महाराज, (नंदेश्वर) यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या पनवेल तालुक्यातील न्हावे खाडी येथे मारूती मंदिरात श्री समर्थ सद्गुरूनाय दादा महाराज यांच्या ३९व्या पुण्यतिथी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि.१४) सकाळी १० वाजता या सप्ताहाचा प्रारंभ होऊन सोमवारी (दि.१६) दुपारी १२ वाजता माऊलीवर पुष्पवृष्टीने सांगता होईल. सप्ताहात श्री दासबोध, स. स. बाळकृष्ण महाराज चरित्रामृत, भागवत या ग्रंथाचे पारायण होईल.

या सप्ताहामध्ये काकड आरती, श्रीची नित्यपूजा, ग्रंथवाचन व ध्यान, भजन, प्रवचन, दुपारची आरती, ग्रंथवाचन व ध्यान, संध्याकाळची आरती, ग्रंथवाचन व ध्यान, भजन व किर्तन, रात्री ११ नंतर रात्रीचे बारा अभंग शेजारती असे नित्याचे कार्यक्रम होणार आहेत.

या कार्यक्रमाचे व्यवस्थापक कानाशेठ ठाकूर, उद्योगपती, न्हावेखाडी जय हनुमान ग्रामस्थ मंडळ, श्री गणेश मित्र मंडळ, न्हावेखाडी, उत्तरपाडा, देवसागर साधक समाज सर्व महिला भगिनी, न्हावा, न्हावाखाडी, न्हावा खाडी, आहेत. देवसागर साधर समाज (इंचगिरी सांप्रदाय) जय हनुमान मंदिर, मराठी शाळेच्या बाजुला, न्हावा खाडी, उत्तर पाडा येथे हा सप्ताह होणार आहे.

# नवी मुंबई पालिकेचे पहिले ई-चार्जिंग स्टेशन खुले

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या सहभागातून नेरुळ येथील सीवूड मॉलजवळील ज्वेल्स ऑफ नवी मुंबई परिसरात नवीन ई व्ही चार्जींग स्टेशन हे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून गुरुवार,५ जून २०२५ रोजीपासून जनतेसाठी खुले करण्यात आले आहे. ही सुविधा नवी मुंबईकरांसाठी पर्यावरणपूरक आणि शाश्वत वाहतुकीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.



ई व्ही चार्जींग स्टेशनमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा १) दोन चाकी, तीन चाकी व चार चाकी वाहनांसाठी चार्जिंग सुविधा, २) दोन गन फास्टर चार्जर, ३) मोबाईल ॲपद्वारे चार्जिंगसाठी आगाऊ बुकींग सुविधा, ४) सार्वजनिक वापरासाठी २४X७ सेवा उपलब्ध, ५) सुरक्षित आणि प्रशस्त पार्किंगची सुविधा, ६) आधुनिक आग प्रतिबंधक उपाययोजना, ७) विश्रांतीसाठी शांत परिसर व खेळाचे मैदान, ८) परवडणारे दर आणि सोयीस्कर वापर

ही सेवा सुरू करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे इलेक्ट्रीक वाहनधारकांना शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी चार्जिंगची सोपी व सुरक्षित सुविधा पुरविणे हा आहे. जेणेकरून हरित व प्रदूषणमुक्त नवी मुंबई घडविण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले जाईल.

नवी मुंबईतील या पहिल्या सार्वजनिक ई व्ही चार्जिंग स्टेशनमुळे, शहरात इलेक्ट्रीक वाहनांचा वापर वाढण्यास प्रोत्साहन मिळेल, आणि पर्यावरण रक्षणास चालना मिळेल, असा विश्वास नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केला आहे. त्या अनुषंगाने सर्व इलेक्ट्रीक वाहन धारकांनी या सुविधेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेण्याचे आवाहन नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या वतीने करण्यात येत आहे.

# चावणे येथे उमेद पदाधिकारी वार्षिक सर्वसाधारण सभा

**मोहोपाडा :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) संचलित स्वराज्य महिला प्रभाग संघाची वार्षिक सर्व साधारण सभा रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील ग्रुप ग्रामपंचायत चावणे येथील कार्यालयात झाली. या वेळी उमेदचे पदाधिकारी व केळवणे ग्रामसंघाच्या सदस्या उपस्थित होत्या.

प्रास्ताविक निशिगंधा भोंडकर यांनी केले व त्यानंतर केशर पाटील, केळवणे प्रभागाचे समन्वयक अनंत उघडे, चावणे सरपंच सुप्रिया सोनावळे, ग्राम विकास अधिकारी विजय नलावडे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, स्वराज्य महिला प्रभागसंघात १७ ग्रामसंघ, ३९९ बचत गट व ४००० कुटुंबे जोडली गेली आहेत. सूत्रसंचालन अश्विनी काकडे यांनी केले.



# नवी मुंबईत राज्य शासनाकडून आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटीची उभारणी

## पाच विदेशी विद्यापीठांना देण्यात येणार इरादापत्र

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

क्रिएटिंग न इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी या महाराष्ट्र सरकारच्या उपक्रमाअंतर्गत, पाच जागतिक स्तरावर प्रसिद्ध परदेशी विद्यापीठांना मुंबई आणि नवी मुंबईत त्यांच्या कॅम्पसची स्थापना करण्यासाठी इरादापत्रे अधिकृतपणे प्रदान केली जाणार आहेत. यामध्ये ॲबर्डीन विद्यापीठ, यॉर्क विद्यापीठ, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी आणि इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन या विद्यापीठांचा समावेश आहे. इरादापत्र प्रदान समारंभ शनिवार, दिनांक १४ जून २०२५ रोजी ताज महाल पॅलेस हॉटेल, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार तसेच उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचीदेखील गौरवशाली उपस्थिती लाभणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली, सिडकोमार्फत उभारल्या जाणाऱ्या या आंतरराष्ट्रीय एज्युसिटीमुळे संपूर्ण भारतातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची संधी मिळणार असून, हे शिक्षण विविध संस्कृतींच्या आदान-प्रदानाला चालना देईल आणि विविध पार्श्वभूमीतील विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये सहकार्य व संवाद वाढवेल.

भारतामध्येच आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देणे आणि परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस महाराष्ट्रात स्थापन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटी प्रकल्पाच्या अंतर्गत, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पाच किलोमीटर परिसरात टॉप १० परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस उभारण्याचे नियोजन आहे. ही देशातील पहिली अशा प्रकारची आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटी ठरणार आहे.

हा प्रकल्प नवी मुंबई व मुंबईला जागतिक शैक्षणिक केंद्र म्हणून ओळख मिळवून देईल आणि महाराष्ट्र राज्याचे एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट व भारताचे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे आर्थिक लक्ष्य २०२९पर्यंत साध्य करण्यासाठी एक महत्त्वाचा घटक ठरेल.

# उरणमध्ये फॉर्मल प्रेसिडेंट फोरम मीट



**उरण : बातमीदार**

उरणमधील भोईर गार्डन कोटनाका येथे जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन फेडरेशन वन बी तर्फे फॉर्मल प्रेसिडेंट फोरम मीटचे आयोजन करण्यात आले होते. सोहळा साजरा होण्यासाठीचा बहुमान होम ग्रुपला म्हणजे उरण जायंट्स ग्रुपला मिळाला होता आणि हा सन्मान जायंट्स ग्रुपच्या इन्चार्ज प्रियंवदा भिकाजी तांबोटकर यांना मिळाला.

उरण जायंट्स ग्रुपच्या अध्यक्षा संगीता ढेरे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमासाठी स्पीकर म्हणून सी,सी.एम. एन्ड इन्चार्ज फॉरमर प्रेसिडेंट फोरम दिनकर अमीन यांना बोलाविण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून वल्ड डेप्युटी चेअरमन पी. सी. जोशी लाभले होते. फेडरेशन वन बीचे अध्यक्ष जायंट विश्वामित्रा भैरवानी यांच्या मार्गदर्शनानुसार ही मिटिंग घेण्यात आली. यासाठी मोलाचे सहकार्य कार्याध्यक्ष एनसीएफ इंजिनिअर सतीश अलगुर यांनी पाहिले. एनसीएफ उपेंद्र मेनन, एनसीएफ ललिता वासन, स्पेशल कमिटी मेंबर आनंदराय केणी, माजी अध्यक्ष ए. एस. महादेवन या दिग्गजांचे मार्गदर्शन यावेळी लाभले. कार्यक्रमासाठी सचिव म्हणून तृप्ती भोईर यांची नेमणूक करण्यात आली.

या सभेसाठी माजी अध्यक्ष विनायक पै, सेक्रेटरी चेतन ठक्कर, माजी अध्यक्ष देवेंद्र पिंपळे, सदस्या चैत्राली ठक्कर, सदस्य आनंद ठक्कर यांचे योगदान महत्त्वाचे आहे.






# सुधागडातील रासळ सरपंच, सदस्यांसह शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

## खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील यांनी केले स्वागत

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीने संघटनात्मक दृष्ट्या आपली पकड मजबूत करायला सुरुवात केली आहे. पाली सुधागड तालुक्यातही भाजपने पक्ष वाढीच्या दृष्टीने मुसंडी मारली असून दैनंदिन होणाऱ्या पक्ष प्रवेशाने भाजपला मोठी ताकत व उभारी मिळते आहे. तालुक्यातील सामाजिक, राजकीय व आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्वपूर्ण असणाऱ्या रासळ ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य व शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.



सुधागडात भाजपची जोरदार मुसंडी पहावयास मिळत असून पाच्छापूर ग्रामपंचायत पाठोपाठ रासळ ग्रामपंचायत ही भाजपमध्ये विलीन झाल्याने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपला मोठा फायदा होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. प्रवेशकर्त्यांचे खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, प्रकाशभाऊ देसाई, गीताताई पालरेचा, राजेश मपारा, श्रीकांत ठोंबरे आदींनी भाजपत स्वागत केले.

युवा सक्षम नेते नरेश खाडे व अन्य वरिष्ठ पदाधिकारी यांच्या प्रयत्नांना यश येऊन रासळ ग्रामपंचायतीत मोठी राजकीय उलथापालथ झाल्याचे बोलले जात आहे. या पक्ष प्रवेशात ग्रामविकास परिवर्तन आधाडीच्या रासळ ग्रामपंचायत सरपंच प्रणिता प्रवीण खाडे, सदस्य नेहा रोहिदास खाडे, सदस्य ताई लक्ष्मण वाघमारे, संपदा शिरीष मांढरे (भाजप), दर्शन चिमण मोरे (भाजप), तसेच कार्यकर्ते प्रवीण खाडे, दीपक खाडे,सुरेश खाडे, श्रीधर खाडे, नितीन देसाई, किशोर मोरे,कैलास दळवी, सचिन खाडे, निलेश लहाने, सागर खाडे, सुधीर खाडे, शेखर सुखदरे, विजय जाधव, विनोद वाघमारे, अरुण खाडे, नितीन जाधव, शरद खाडे, सुरेश दळवी, मंगेश म्हसके, जनार्दन दळवी, चंद्रकांत म्हसके, दिलीप सुखदरे, चंद्रकांत जाधव, रामदास मोरे, रोहिदास खाडे, शिरीष मांढरे, सुनील दळवी, वामन खाडे, दशरथ सावंत, योगेश भौड, सटूराम दळवी, संतोष भौड,आदींसह कार्यकर्त्यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला.

या वेळी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना खासदार धैर्यशील पाटील म्हणाले की, सुधागड तालुक्यात विविध पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी हे भाजपमध्ये सामील होत आहेत, ही अतिशय आनंददायी बाब आहे. रासळ ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य व शेकडो कार्यकर्त्यांनी ज्या विश्वासाने कमळ हाती घेतले त्यांचा विश्वास कायम सार्थकी ठरेल. जनतेला अपेक्षित सर्वांगीण व शाश्वत विकास आम्ही करू, विकासकामी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही खासदार पाटील यांनी दिली. रासळ ग्रामपंचायत भाजपात विलीन होण्याचा पक्षाबरोबर मलाही जास्त फायदा झाला. माझे नातेवाईक या गावात असल्याने नाती व राजकीय कर्तव्ये यामध्ये माझी कोंडी होत असे, आता ही मंडळी भाजपात आल्याने समाधान वाटत असल्याचे खासदार पाटील म्हणाले.

या वेळी आमदार रविशेठ पाटील म्हणाले की, पेण सुधागड मतदारसंघ असो की रायगड जिल्हा भाजप शिवाय पर्याय नाही, लोकसभेला सुधागड तालुक्यातून खासदार सुनील तटकरेंना सर्वाधिक मताधिक्य मिळवून दिले. व त्यांना निवडून आणले, विधानसभा निवडणुकीत तर त्याहून अधिक मताधिक्य या तालुक्याने दिले. पेण तालुका जसा विकासाचे व्हिजन ठेऊन एकसंघ झाला तसा सुधागड तालुका एकसंघ होणे काळाची गरज आहे. प्रलंबित असलेली कामे येत्या काळात पूर्णत्वास नेऊ. पुढच्या काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, ग्रामपंचायत निवडणुकीत आपल्याला जिंकायचं आहे. राज्य व केंद्रातील सत्तेचा विकासासाठी वापर करून घ्यायचा आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी महाविद्वान व शक्तिशाली आहेत, त्यांनी पहेलगाम हल्ल्याचा बदला घरात घुसून घेतला. त्यांच्याकडे विकासदृष्टी आहे. म्हणून येत्या काळात सर्वांनी भाजपची कास धरावी, असे आवाहन आमदार पाटील यांनी केले.

या वेळी प्रकाशभाऊ देसाई म्हणाले की, भाजपच्या कार्यप्रणाली वर प्रभावित होऊन लोकांमध्ये उत्साह व औस्युक्य आहे की आम्हाला पक्षात कस सामील होता येईल, भाजपचे यश हे केवळ सुधागड, रायगड जिल्हा राज्य व देशापुरते मर्यादित राहीले नसून ते आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या देशाला सातत्याने न्याय मिळवून देण्याची भूमिका घेतली. या देशाचे अस्तिव टिकवून देशाला कायम सुरक्षित व भक्कम ठेवण्याचे सामर्थ्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात आहे. गाव तालुक्याचा खऱ्या अर्थाने विकास साधायचा असेल तर भाजपशिवाय पर्याय नाही. भाजपच्या जुन्या कार्यकर्त्यांनी भाजप पक्षाला टिकवून ठेवले, पक्ष कणाकणाने वाढविला, हे वास्तव आहे, म्हणून आज आम्ही या प्रवाहात सामील होऊ शकलो, आज भाजप सागराप्रमाणे फोफाऊन विशाल रूप धारण करतोय. या देशातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षित व आश्वाशीत करणारा पक्ष भाजप आहे. देशाला वाचविण्याचे सामर्थ्य भाजपात आहे, असे देसाई म्हणाले. येत्या काळात सात ते आठ ग्रामपंचायती भाजपमध्ये सामील होतील या दिशेने वाटचाल सुरू आहे. तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य भाजपचेच निवडून येतील, असा विश्वास देसाईंनी व्यक्त केला.


रविशेठ पाटील, धैर्यशील पाटील यांच्या कार्यक्षम व भक्कम नेतृत्वात भाजप आकार घेतोय, एकेकाळी या दोन बलाढ्य शक्ती एकमेकांविरोधात लढत होत्या, आज या शक्ती एकत्र आल्याने पेण तालुक्यात भाजपचे मोठे प्राबल्य वाढले आहे. रविशेठ पाटील हे देवमाणूस आहेत, त्यांच्याकडे विकासाचे व्हिजन आहे, त्यांनी गावोगावी रस्ते, पाणी मूलभूत सेवा सुविधा पोहचवल्या. त्यांच्या लोकप्रियतेने त्यांना ७० हजार मतांचा लीड मिळाला, याचे फुकटचे श्रेय कुणी लाटू नये असा टोला देसाई यांनी विरोधकांना लगावला. सर्वांनी एकदिलाने व एकसंघपणे भाजप वाढवूया, आगामी सर्व निवडणुकात भाजपचे प्रस्थ कसे वाढेल यासाठी जोमाने काम करूया, असे आवाहन देसाई यांनी केले.

सरपंच प्रणिता खाडे म्हणाल्या की, राज्य आणि देशात भाजप प्रणित सरकार आहे. आपल्याला गावाचा तालुक्याचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर सत्ताधारी पक्षात असणे काळाची गरज आहे. भाजपची कार्यप्रणाली व विकासाचे व्हिजन प्रभावी व आकर्षित करणारे असल्याने आम्ही भाजपात प्रवेश केला. आम्हाला विश्वास आहे की, भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली जास्तीत जास्त विकास साधला जाईल.

या वेळी भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, आरिफ मणियार यांनीही आपल्या जोरदार भाषणातून भाजपचा कारवा दिवसेंदिवस वाढत असून सुधागडात भाजपला सुगीचे दिवस आल्याचे स्पष्ट केले. या कार्यक्रमास खासदार धैर्यशील पाटील, आमदार रवींद्र पाटील, अ‍ॅड. निलिमाताई पाटील, भाजप नेते प्रकाशभाऊ देसाई, गीताताई पालरेचा, जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, आलाप मेहता, तालुकाप्रमुख श्रीकांत ठोंबरे, नरेश खाडे, शरद चोरगे, प्रणाली शेठ, दादा घोसाळकर, राजेंद्र गांधी, अजय खंडागळे, गिरीश सकपाळ, आरिफ मणियार, माजी सभापती पिठू डुंमना,यशवंत पालवे, विठ्ठल सिंदकर, उत्तमराव देशमुख, पराग मेहता, विशाल गुरव, राजेश गोरे, रोहित भगत, अ‍ॅड. आरती गुप्ता, अरविंद कणसे, ज्ञानेश्वर फोंडे, बळीराम जाधव, रामभाउ आंग्रे, रोहिदास साजेकर, रोशन बेलोसे, प्रवीण घायले, सुधीर पाडसे, दर्शन मोरे, गिरीश मांढरे, राकेश ठाकूर आदींसह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मातीच्या भरावाखाली अडकलेल्या गाईचा मृत्यू





**पाली : प्रतिनिधी**

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे कंपनीच्या संलग्न बेणसे झोतिरपाडा ग्रामपंचायत हद्दीत नवीन प्रकल्पाची उभारणी होत आहे. रिलायन्स नागोठणेच्या नव्या प्रकल्पासाठी ५० ते ६० फूट उंचीचा मातीचा भराव केला जात आहे. मातीच्या भरावाखाली चरण्यासाठी गेलेली अनेक जनावरे अडकून मृत्यूच्या खाईत जात आहेत. बेणसे येथील पशुपालक आशिफ मोमीन यांची दुभती गाय मातीच्या ढिगाऱ्याखाली व चिखलात फसली होती, या गाईला पोलीस प्रशासन व स्थानिकांनी वाचवले होते, मात्र ही गाय पूर्णतः अर्धमेली झाल्याने तिचा (दि.१२) जून गुरुवारी दुर्दैवी मृत्यू झाला.

या गाईचे वासरू पोरके झाले आहे. तर पशुपालक आशिफ मोमीन यांच्यावर आस्मानी संकट कोसळले आहे, मात्र स्थानिकांची गुरे दगावली जात असताना रिलायन्स व्यवस्थापन पशुपालकांना नुकसान भरपाई देण्याबाबत वाऱ्यावर सोडत असल्याचे दिसून येत आहे. तसेच यापूर्वी रसायनमिश्रित दूषित पाणी पिऊन पशुपालक आसिफ मोमीन यांची आजवर चार गुरे दगावल्याने त्यांच्या कुटुंबावर उपासमारीचे संकट आले आहे.

आजच्या परिस्थितीत ही रिलायन्सच्या दूषित पाण्याचे तलाव दिसत असून मच्छिमार व पशुपालक यांच्यावर अक्षरशः उपासमारीची वेळ आली आहे. रिलायन्स नागोठणे व्यवस्थापणाकडे अनेक तोंडी व लेखी तक्रारी करून नुकसान भरपाई मागितले जाते, मात्र रिलायन्स प्रशासन वेळकाढू पणाची भूमिका घेत असल्याने जनतेतून संताप व्यक्त केला जात आहे.





**चौक : खोपोली परिसरात अनेक ठिकाणी रस्ते डागडुजीची कामे सुरू आहेत. डांबरीकरण तसेच खड्डे बुजवण्याची कामे आयआरबीकडून करण्यात येत आहेत.** (छाया : अर्जुन कदम)

## स्पर्धा परीक्षांसाठी १६ जूनपासून फाऊंडेशन कोर्स

**माणगाव : प्रतिनिधी**

वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट रोहा यांच्या पुढाकाराने रोटरी प्रतिष्ठान खेड व एस.एस.निकम इंग्लिश स्कुल माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षांच्या फाउंडेशन कोर्सचा सुरुवात एस.एस.निकम इंग्लिश स्कुल माणगाव येथे करण्यात येत असून या कोर्सच्या शुभारंभ सोमवारी (दि.१६) कुणबी भवन येथे खासदार सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली व मंत्री आदिती तटकरे, अनिकेत तटकरे यांच्या मुख्य उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे.

हा फाऊंडेशन कोर्स पुढील पाच वर्ष सातत्याने सुरू राहणार असून तो पूर्णतः ऑफलाईन पद्धतीने माणगाव आणि इंदापूर परिसरात राबविला जाणार आहे. या कोर्सच्या अभ्यासक्रमामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित या विषयांचा समावेश असून हा कोर्से इंग्रजी, मराठी आणि उर्दू माध्यमातील सर्व विद्यार्थ्यांसाठी खुला असणारा आहे. शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या एस.एस.निकम स्कुल माणगाव या संस्थेने सन १९७८ पासून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे काम सातत्याने सुरू ठेवले आहे.

या संधीचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन रोटरी प्रतिष्ठान खेड अध्यक्ष बिपीन पाटणे, माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.मदन निकम व सहकारी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ८८३०७८२७०२/ ९५०३८९३४०१ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## वावंढळ स्मशानभूमी निवारा, शेड वादळात जमीनदोस्त

**चौक : प्रतिनिधी**

गुरुवारी रात्री अचानक कडकडणारी वीज, तुफान पाऊस आणि बेफान वादळ वाऱ्याने वावंढळ परिसरात हाहाकार माजवला होता. वावंढळ परिसरात रात्री आलेल्या वादळवारा आणि तुफान पावसाने अनेकांचे नुकसान झाले आहे.



तुफान पावसाने आणि वादळ वाऱ्याने अनेकांच्या घरांचे नुकसान झाले आहे, तर वावंढळ गावच्या स्मशानभूमी निवारा शेड पूर्णपणे जमीनदोस्त झाली आहे. काही घरांवरती झाडे पडून पत्रे आणि कौले फुटली आहेत. अनेक ठिकाणच्या विद्युत पुरवठा करणाऱ्या वाहिनी, खांब वाकल्याने खाली आल्या असून तुटल्या देखील आहेत. विद्युतपुरवठा खंडित झाल्याने पाणीपुरवठा खंडित झाला आहे. तर रात्रभर वीज पुरवठा नसल्याने वयोवृद्ध आणि लहान मुलांच्या झोपेवर परिणाम झाला असून डास आणि मच्छर यांचे रात्रभर साम्राज्य पसरले होते. तहसीलदार अभय चव्हाण यांच्या सूचनेनुसार सकाळी मंडळ अधिकारी माणिक सानप आणि तलाठी उदयसिंह देशमुख यांनी नुकसान ठिकाणची पाहणी केली आहे. विद्युत वितरण कंपनीचे अभियंता बोधनकर यांनी ही आपल्या टीमसह दाखल होऊन वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले.

## माणगावात शास्त्रीय व सुगम संगीत मैफिल

### पुस्तकाचेही प्रकाशन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात अक्षरा म्युझिक अकॅडमीतर्फे रविवार दि.१५ जून २०२५ रोजी सकाळी ९ वा. कुणबी भवन, निजामपूर रोड, माणगाव याठिकाणी शास्त्रीय व सुगम संगीत मेहफिल, पुस्तक प्रकाशन सोहळा, सुगम संगीत संगीतातील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमास गायिका आणि स्व.डॉ.सुनील मराठे यांच्या मातोश्री उर्मिला मराठे, मुंबई लॉ कॉलेजचे निवृत्त प्राचार्य अँड.प्रकाश मोकल, माणगाव नगरीच्या नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्षा हर्षदा काळे, माणगाव नगरपंचायतीचे सर्व नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी व सदस्य, संगीत विशारद रामदास मोकल, यशवंत मेस्त्री, गायक व सुगम संगीत परीक्षक सुधीर धुतरे, भारतीय संगीत कलापीठ संभाजीनगर संस्थापक अध्यक्ष प्रा.राहुल आघाडे, स्वरभक्ती संगीत विद्यालय नाशिक संचालिका भक्ती कपिल कडु आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास प्रतीक निकम, डॉ.सचिन चव्हाण, रायगड भूषण राकेश मेस्त्री, सचिन म्हात्रे, डॉ.उत्तम जावळे, धनश्री मेहता, सचिन धोंडगे, डॉ.गौतम राऊत, अंजली चोभारकर, उषा उभारे, डॉ.आबासाहेब पाटणकर, अँड. सुनीता मराठे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. या कार्यक्रमात भारतीय संगीत कलापीठ संभाजीनगर विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या सुगम संगीत परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप उपस्थित मान्यवरांच्याहस्ते करण्यात येणार आहे. तसेच स्व.डॉ.सुनील मराठे यांच्या प्रेरणेतून निर्मित लेखिका प्राचार्या आशा शांताराम शिंदे लिखित माझ्या नवऱ्यानं आणलाय हिरोहंडा आणि इतर लेख या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास सर्व निमंत्रितांनी आवश्य उपस्थित राहावे असे आवाहन संगीत विशारद तथा अक्षरा म्युझिक अकॅडमीच्या संचालिका डॉ.अक्षरा सचिन चव्हाण व अकॅडमीचे सर्व विद्यार्थी यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## पोलीस निरीक्षक बंडगर यांची बदली

### मुरूडमध्ये कर्मचारींवृंदाकडून निरोप समारंभ

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर यांची मुरुड पोलीस ठाणे येथून ते सोलापूर शहर तसेच पोलीस उपनिरीक्षक अविनाश राठोड यांची मुरुड पोलीस ठाणे ते नाशिक परिक्षेत्र अशी प्रशासकीय कारणास्तव बदली झाल्याने त्यांचा निरोप समारंभ मुरूड पोलीस ठाण्यात पार पडला.



कार्यक्रमाकरिता सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख, पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील यांच्या मुख्य उपस्थित निरोप समारंभ झाला. या वेळी बंडगर यांना शाल श्रीफळ, पुष्पगुच व निसर्ग सौंदर्य असलेली फ्रेम बहाल करण्यात आली. आभार कॉन्स्टेबल मकरंद पाटील यांनी मानले.

मुरूड जंजिरा पोलीस ठाण्याचे निरीक्षक नामदेव बंडगर हे कमी कालावधीसाठी मुरूड पोलीस ठाण्यात कार्यरत होते, परंतु त्यांनी आपला कमी कालावधी असतान सुधा शिस्तब्ध काम करून शांतता राखण्यात मोठे यश मिळवले होते. विधान सभा निवडणूक त्यांच्याच काळात अतिशय उत्कृष्ट काम केल्याने येथील निवडणुका शांततेत पार पडल्या होत्या. सर्व नागरिकांशी मिळून मिसळून वागून कायदा सुव्यवस्था त्यांनी उत्तम रित्या हाताळली होती. मुरूड पोलीस ठाण्यात त्यांना कमी कालावधी मिळाल्याने सर्व जनता त्यांना जास्त कालावधी मिळावयास पाहिजे होता, अशी अपेक्षा व्यक्त करीत आहे.

## पाटी आणि पेन्सिल कविता संग्रहाचे प्रकाशन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ येथील रहिवाशी असलेले रायगड जिल्हा परिषद शाळेचे निवृत्त मुख्याध्यापक आणि माजी शिक्षण विस्तार अधिकारी अशोक सोपान काटे यांच्या कविता संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. अशोक काटे यांच्या पाटी आणि पेन्सिल या काव्य संग्रहाचे प्रकाशन लेखक प्रा. संजय गायकवाड यांचे हस्ते झाले.



नेरळ जवळील बोपेले येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृह आगरी समाज हॉल येथे अशोक काटे यांच्या पाटी आणि पेन्सिल या काव्य संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी लेखक प्रा.संजय गायकवाड, माजी उप सभापती अरविंद पाटील, अभ्यासक वसंत कोळंबे, ग्रामपंचायत सरपंच महेश विरले,जिल्हा परिषदेचे माजी सदस्य नागो गवळी, सावळाराम जाधव, वामन जाधव, भगवान धुळे, शिवराम तुपे, बागुल गुरुजी, माजी सरपंच अर्जुन क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात लेखक कवी अशोक काटे यांची कन्या सीमा गंगावणे यांची काव्याच्या माध्यमातून आपल्या वडिलांचे काव्य संग्रह प्रकाशन कार्यक्रमात सदिच्छा दिल्या. तर बागुल गुरुजी आणि डॉ वामन जाधव यांनी मनोगत व्युक्त केले.

ज्येष्ठ अभ्यासक वसंत कोळंबे यांनी या वेळी बोलताना शिक्षणाचे महत्त्व सांगणारे हे कविता संग्रह असून या काव्य संग्रहातील ३० पैकी १७ कविता या समाज प्रबोधन करणाऱ्या आहेत. काटे गुरुजी यांनी आपल्या काव्य संग्रहातून शिक्षण कधीही वाया जात नाही. शिक्षण घेतल्यावर कोणत्याही जाती धर्मात जन्माला आले तर तुम्ही गौरव होणारच आहे. आपले काव्य संग्रह प्रबोधन करणारे काव्य संग्रह आहे असून निवृत्ती नंतर काटे गुरुजी यांनी काव्य संग्रहातून लिखाणाला सुरुवात केली असून यापुढे अनेक कविता संग्रह, पुस्तके लिहावीत, अशी सूचना केली.

समाजात प्रोत्साहन देणारे अनेक असतात आणि त्यामुळे निवृत्ती नंतर की ना लिखाण केले पाहिजे आणि तत्वासोबत ठेवून विचार मांडण्याचे स्वतंत्र सर्वांना असून काटे गुरुजींनी गद्य लिखाण करावे, असे आवाहन केले.

शेवटी काव्य संग्रहाचे लेखक अशोक काटे यांनी माझ्या काव्या संग्रहाला कविवर्य पद्मश्री नारायण सुर्वे यांनी प्रस्तावना दिली असून त्यांची प्रस्तावना मिळणे हीच माझ्यासाठी खरे प्रशस्तिपत्रक आहे. त्यांच्या पाठिंब्यामुळे मला पुस्तक आणि काव्य लेखन करण्याचे प्रेरणा मिळाली असून नेरळ आणि परिसरातील ग्रामस्थांचे मोठे योगदान माझ्या कार्यात असल्याचे अशोक काटे यांनी नमूद केले. सूत्रसंचालन यशवंत वाघरे यांनी केले.

# पॅट कमिन्सचे कसोटीत ३०० बळी

## दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पहिल्या डावात सहा विकेट्स



* ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने दक्षिण आफ्रिकेच्या सहा फलंदाजांना पॅव्हेलियनची वाट दाखवली. यादरम्यान त्याने आपल्या कसोटी कारकिर्दीत ३०० गडी बाद करण्याचा पराक्रम आपल्या नावावर केला.

* पॅट कमिन्सने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत सर्वाधिक गडी बाद करणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत जसप्रीत बुमराहला मागे सोडले आहे.

बुमराहच्या नावे या हंगामात ७७ गडी बाद करण्याची नोंद आहे.

* ऑस्ट्रेलियासाठी ३०० गडी बाद करण्याची कामगिरी करणारा पॅट कमिन्स चौथा सर्वात वेगवान गोलंदाज ठरला आहे. अशा प्रकारे त्याने जोरदार कामगिरी केलीय.

**लंडन : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेतील अंतिम सामना दक्षिण आफ्रिका आणि ऑस्टेलिया या दोन्ही संघांमध्ये सुरू आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना चांगलाच घाम फोडला. कमिन्सने सहा विकेट्स घेत दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण डाव अवघ्या १३८ धावांवर संपवला.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्ससाठी हा सामना ऐतिहासिक ठरला आहे. या डावात गोलंदाजी करताना त्याने दक्षिण आफ्रिकेच्या सहा फलंदाजांना पॅव्हेलियनची वाट दाखवली. यादरम्यान त्याने आपल्या कसोटी कारकिर्दीत ३०० गडी बाद करण्याचा पराक्रम आपल्या नावावर केला आहे. ऑस्ट्रेलियासाठी अशी कामगिरी करणारा तो चौथा सर्वात वेगवान गोलंदाज ठरला आहे.

यासह पॅट कमिन्सच्या नावे आणखी एका मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे. त्याने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत सर्वाधिक गडी बाद करणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत जसप्रीत बुमराहला मागे सोडले आहे. बुमराहच्या नावे या हंगामात ७७ गडी बाद करण्याची नोंद आहे. आता कमिन्सने त्याला मागे सोडले आहे. कमिन्सच्या नावे ७९ गडी बाद करण्याची नोंद झाली आहे.

या सामन्यातील पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण डाव अवघ्या २१२ धावांवर आटोपला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेला अवघ्या १३८ धावा करता आल्या. दक्षिण आफ्रिकेकडून फलंदाजी करताना बेडिंघमने सर्वाधिक ४५ धावांची खेळी केली, तर कर्णधार टेंबा बावुमाने ३५ धावांची खेळी केली, पण पॅट कमिन्सच्या शानदार गोलंदाजीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण डाव अवघ्या १३८ धावांवर आटोपला.



## इंग्लंड दौऱ्यावर गेलेले हेड कोच गौतम गंभीर अचानक भारतात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी इंग्लंड दौऱ्यावर असताना अचानक भारतात परतण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या भारतीय संघ इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेची तयारी करत असून गंभीर यांना कौटुंबिक आपत्कालीन परिस्थितीमुळे मायदेशी परतावे लागले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मुख्य प्रशिक्षक गंभीर यांच्या आई सीमा गंभीर यांना ११ जून २०२५ रोजी हृदयविकाराचा झटका आला, ज्यामुळे त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत कुटुंबियांनी गंभीर यांना माहिती दिल्यानंतर त्यांनी त्वरित भारतात परतण्याचा निर्णय घेतला. सध्या त्यांच्या आईची प्रकृती स्थिर असून त्या धोक्याबाहेर आहेत, अशी माहिती समोर आली आहे.

# जॉर्ज मुन्सेची धमाकेदार खेळी

## वर्ल्डकप पात्रता फेरीतील सामन्यात कुटल्या १९१ धावा

**डंडी : वृत्तसंस्था**

आयसीसी क्रिकेट वर्ल्डकप पात्रता फेरीतील स्कॉटलंड विरुद्ध नेदरलँड्स यांच्यातील सामन्यात षटकार चौकारांची बरसात झाल्याचे पहायला मिळाले. स्कॉटलंडमधील डंडी येथील फोर्टहिलच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना स्कॉटलंडच्या संघाने ३६९ धावांचा डोंगर उभारला होता. या सामन्यात स्कॉटिश सलामीवीर जॉर्ज मुन्से याने १९१ धावांची धमाकेदार खेळी केली.



स्कॉटलंडचा सलामीवीर जॉर्ज मुन्से याने १४ चौकार आणि ११ षटकारांच्या मदतीने या सामन्यात १५० चेंडूत १९१ धावा कुटल्या. द्विशतक साजरे करण्याची सुवर्ण संधी त्याच्याकडे होती, पण १० चेंडू शिल्लक असताना तो फसला. द्विशतक तर हुकलेच, शिवाय धावांचा डोंगर उभारूनदेखील संघाच्या पदरी पराभव आला.

स्कॉटलंडच्या ताफ्यातून जॉर्ज मुन्सेने केलेल्या १९१ धावांच्या खेळीला कडक रिप्लाय देताना नेदरलंडकडून मॅक्स ओ'दाउद याने १५८ धावांची नाबाद खेळी केली. १३० चेंडूतील या खेळीत त्याने १२ चौकार आणि चार षटकार मारले.

या खेळीमुळे जॉर्ज मुन्सेची विक्रमी खेळी व्यर्थ ठरली अन् नेदरलंडच्या संघाने पहिल्यांदाच ३००पेक्षा अधिक धावांचा यशस्वी पाठलाग करून दाखवला.

विशेष म्हणजे स्कॉटलंड संघाने भारताचा रेकॉर्डही मागे टाकलाय. भारतीय संघाने २०१३मध्ये ऑस्ट्रेलियासमोर ३६० धावांचा यशस्वी पाठलाग केल्याचा रेकॉर्ड आहे. नेदरलंडने ३७० धावांचा यशस्वी पाठलाग करत टीम इंडियाला मागे टाकले.

### १५ वर्षांचा विक्रम मोडला

जॉर्ज मुन्सेचे द्विशतक अवघ्या नऊ धावांनी हुकले, परंतु या खेळीसह मुन्सेने खास विक्रम आपल्या नावे केला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील असोसिएट संघाकडून (आयसीसी पूर्णवेळ सदस्य नसणारा संघ) सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम आता त्याच्या नावे झाला आहे. त्याने १५ वर्षांपासून अबाधित असलेला पॉल स्टर्लिंगचा रेकॉर्ड मोडीत काढला.

आयरिश फलंदाजाने २०१०मध्ये कॅनडाविरुद्ध १७७ धावांची खेळी केली होती. आता स्कॉटलंडचा मुन्से १९१ धावांसह या यादीत टॉपला पोहचला आहे.

# मेजर लीग क्रिकेटमध्ये फिन ॲलेनची तुफान फटकेबाजी

## एकाच सामन्यात दोन विक्रम मोडले

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडचा सलामीवीर फिन ॲलनने मेजर लीग क्रिकेट २०२५च्या पहिल्याच सामन्यात सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न संघाकडून खेळताना मोठा पराक्रम केला. वॉशिंग्टन फ्रीडमविरुद्ध सामन्यात त्याने अवघ्या ४९ चेंडूत १५० धावा केल्या, ज्यात पाच चौकार आणि १९ षटकारांचा समावेश होतो.

या कामगिरीसह ॲलन टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद १५० धावांचा टप्पा गाठणारा पहिलाच खेळाडू ठरला. या खेळीदरम्यान त्याने वेस्ट इंडिजचा विस्फोटक फलंदाज ख्रिस गेलचा षटकारांचा विक्रम मोडला.



टिम सेफर्टसोबत डावाची सुरुवात करताना फिन ॲलेनने सुरुवातीपासूनच प्रहार केला. त्याने पॉवरप्लेमध्ये अवघ्या १४ चेंडूत ४० धावा पूर्ण केल्या, ज्यात पाच षटकारांचा समावेश होता. एमएलसीमध्ये सर्वात जलद शतक करण्याचा विक्रम वेस्ट इंडिजच्या निकोलस पूरनच्या नावावर होता. एमएलसीच्या गेल्या हंगामात पूरनने ४० चेंडूत शतक झळकावले. फिन ॲलेनने आता हा विक्रमही त्याच्या नावावर नोंदवला. त्याने अवघ्या ३४ चेंडूत शतक पूर्ण केले.

या सामन्यात फिन ॲलनने १९ षटकार मारले. या कामगिरीसह तो टी-२० क्रिकेटमधील एका सामन्यात सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाज ठरला. यापूर्वी हा विक्रम ख्रिस गेल आणि एस्टोनियाच्या साहिल चौहान यांच्या नावावर होता. टी-२० क्रिकेटच्या एका सामन्यात दोघांनीही प्रत्येकी १८-१८ षटकार मारले होते.

सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न संघाने वॉशिंग्टन फ्रीडमविरुद्धचा सामना १२३ धावांनी जिंकला. प्रथम खेळताना सॅन फ्रान्सिस्कोने २० षटकांत ५ गडी गमावून २६९ धावा केल्या. प्रत्युत्तरात वॉशिंग्टन फ्रीडम संघ १३.१ षटकांत १४६ धावांवर गारद झाला.

# नेमबाजी विश्वचषकात सिफ्त कौर सामराला 'कांस्य'



**म्युनिक : वृत्तसंस्था**

भारताची आघाडीची नेमबाज सिफ्त कौर सामराने हंगामातील तिसऱ्या विश्वचषक स्पर्धेत गुरुवारी महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात कांस्यपदकांची कमाई केली. विश्वविक्रमाची सध्याची मानकरी असलेल्या २३ वर्षी सिफ्तने आठ नेमबाजांच्या अंतिम फेरीत ४५३.१ गुणांची कमाई केली.

नॉर्वेची जीनेट हेग ड्यूस्टेडने ४६६.९ गुणांसह सुवर्णपदक जिंकले. स्वित्झर्लंडच्या एमिली जॅगीला ४६४.८ गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. एमिली ५९० गुणांसह पात्रता फेरीत नवव्या स्थानी होती, पण अंतिम फेरीत स्थान मिळवण्यात ती यशस्वी ठरली.

पात्रतेत सिफ्तने नीलिंग, प्रोन आणि स्टॅन्डिंग या तीन प्रकारांत मिळून एकूण ५९२ गुणांची कमाई करीत दुसरे स्थान मिळवले होते. फ्रान्सच्या अगाथे सेसिल कॅमिली गिरार्डचेही ५९२ गुण होते, परंतु १० गुणांचा वेध अधिक वेळा साधल्याने ती पात्रतेमध्ये अग्रस्थानी राहिली. स्वित्झर्लंडची ऑड्रे गोगनियाट पात्रतेमध्ये तिसऱ्या स्थानी होती.

# एमएलसीमध्ये संजय कृष्णमूर्तीची चमक

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

मेजर लीग क्रिकेट २०२५च्या पहिल्याच सामन्यात फिन अलनने या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात स्फोटक शतक झळकावले. त्याच सामन्यात २२ वर्षीय भारतीय वंशाचा फलंदाज संजय कृष्णमूर्तीची एक अद्भूत स्फोटक खेळीदेखील पहायला मिळाली.

एमएलसीचा पहिला सामना सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न आणि वॉशिंग्टन फ्रीडम यांच्यात खेळला गेला. हा सामना संजय कृष्णमूर्तीच्या ऑकलँडमधील घरापासून फक्त एक मिनिटाच्या अंतरावर खेळला गेला. तिथे त्याची आई ज्युली आणि वडील सत्य कृष्णमूर्तीदेखील होते.

२२ वर्षीय संजय कृष्णमूर्तीने सामना पाहण्यासाठी आलेल्या त्याच्या पालकांना निराश केले नाही. संधी मिळताच त्याने त्यांना त्याची धमाकेदार फलंदाजी दाखवली. भारतातील बंगळुरू येथील रहिवासी असलेल्या सत्य कृष्णमूर्तींचा मुलगा संजयने सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्नकडून खेळताना वॉशिंग्टन फ्रीडमविरुद्ध १८०च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या. त्याच्या फलंदाजीतील सर्वात खास गोष्ट म्हणजे त्याने चौकारांपेक्षा चार पट जास्त षटकार मारले. त्याने २० चेंडूत ३२ धावा केल्या, ज्यामध्ये चार षटकार आणि केवळ एक चौकार होता.



# विमान दुर्घटनेतील मृतांना टीम इंडियाची श्रद्धांजली

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड दौऱ्यावर गेलेल्या भारतीय क्रिकेट संघातील खेळाडूंनी सामन्याला सुरुवात होण्याआधी एक मिनिटाचे मौन बाळगत अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेतील मृतांना श्रद्धांजली वाहिली.

अहमदाबादहून गुरुवारी दुपारी लंडनच्या दिशेने झेपावलेले एअर इंडियाचे प्रवासी विमान कोसळल्याची दुर्घटना घडली होती. या भीषण विमान अपघातात फक्त एकमेव प्रवासी बचावला, तर विमानातील २४१ जणांचा मृत्यू झाला. त्याचप्रमाणे विमान कोसळलेल्या डॉक्टरांच्या वसतिगृहातील २४ जणही मृत्युमुखी पडले आहेत.

### काळ्या फिती बांधून मैदानात

इंग्लंड दौऱ्यावरील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी गेलेला भारतीय संघ बेकेनहॅमच्या मैदानात सराव सामना खेळत आहे. या चार दिवसीय सराव सामन्यासाठी टीम इंडियातील खेळाडू काळ्या फिती बांधून मैदानात उतरले आणि त्यांनी विमान दुर्घटनेतील मृतांना श्रद्धांजली वाहिली.

# इंग्लंड दौऱ्यात सकारात्मक दृष्टिकोन गरजेचा!

## प्रशिक्षक गंभीरचा खेळाडूंना संदेश

**बेकनहॅम : वृत्तसंस्था**

इंग्लंड दौरा आव्हानात्मक असला तरी सकारात्मक दृष्टिकोन बाळगल्यास काहीही शक्य आहे. 'कम्फर्ट झोन'मधून बाहेर येणे सर्वात महत्त्वाचे असल्याचा संदेश भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने युवा खेळाडूंना दिला.

विराट कोहली, रोहित शर्मा आणि रविचंद्रन अश्विन या अनुभवी त्रिकुटाच्या निवृत्तीनंतर भारतीय संघाला आगामी इंग्लंड दौऱ्यात युवा खेळाडूंवर अवलंबून राहावे लागणार आहे. पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला २० जूनपासून सुरुवात होईल. भारतीय संघ २००७नंतर इंग्लंडमध्ये पहिली कसोटी मालिका जिंकण्यासाठी प्रयत्नशील आहे. या मालिकेकडे आपण काहीतरी खास करण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे, असा सल्ला गंभीरने खेळाडूंना दिला.

> **मी जेव्हा तुमच्याकडे पाहतो तेव्हा मला यशासाठीची भूक, जिद्द आणि वचनबद्धता दिसते. आपण त्याग केले, 'कम्फर्ट झोन'मधून बाहेर पडलो, दररोज नाही तर प्रत्येक सत्रात, प्रत्येक तासाला आणि प्रत्येक चेंडूवर लढायला सुरुवात केली, तर हा संस्मरणीय दौरा ठरू शकेल.**
> **-गौतम गंभीर, मुख्य प्रशिक्षक, भारतीय क्रिकेट संघ**







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com